महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
दर रविवार – दालवाटी, चुरमा
* थाळीमध्ये दररोज आमरस *
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी
करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
(आमरस – ४००/– रु. किलो मिळेल)
कापड बाजार,
कोहिनूर शेजारी, अ. नगर

RNI No. 6153/57
समाचार
SAMACHAR

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
VEGETARIAN
RAJ MOTI
राजमोती साबुदाना
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !
aBhee

Volume - 72 | Issue- 215 | Marathi Daily | Saturday 4/5/2024 | Pages - 8 | Price- Rs. 3

आरक्षणाचे गाजर

कर्नाटकमध्ये पूर्वीच्या काँग्रेसच्या सरकारने मुस्लिमांना चार टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र भाजपने तो रद्द करून लिंगायत आणि वोक्कलिंगा समाजामध्ये ते आरक्षण वाटून टाकले. आरक्षण धर्मावर आधारित नसावे, याबाबत दुमत नाही; परंतु एखाद्या धर्मात काही गरीब असतील तर त्यांना ओबीसीतून आरक्षण देता येते. महाराष्ट्रात मराठा आणि धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सुटलेला नाही. न्यायालयानेच या मागण्या फेटाळल्या आहेत. परंतु मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा न्यायप्रविष्ट नसतानाही राज्य सरकारने निर्णय घेऊनही आरक्षण दिले नाही. आता मात्र काँग्रेस सरकारने कर्नाटकमध्ये ते लागू केले आहे. यावरुन देशात रण माजले. आसाम, पश्चिम बंगाल आदि राज्यांमध्ये मुस्लिमांचे प्रमाण जास्त असले तरी तिथे मुस्लीम आरक्षणाचा मुद्दा नाही. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये मुस्लिमांच्या मागासलेपणाचे प्रमाण अधिक आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. कर्नाटकमध्ये मुस्लिमांना सरसकट ओबीसीत आरक्षण देण्याचा निर्णय न्यायालयात टिकणार नसला तरी त्याचे राजकीय भांडवल करण्याचा काँग्रेसचा पुरेपूर प्रयत्न आहे. अर्थात हे कोलीत काँग्रेसनेच ऐन निवडणुकीच्या काळात भाजपच्या हाती दिले. आता हा लोकसभा निवडणुकीतला मुख्य मुद्दा बनला आहे. याबाबत भाजप सातत्याने काँग्रेसवर हल्लाबोल करत आहे. सर्व मुस्लिमांचा ओबीसी कोट्यात समावेश करून काँग्रेस मागासवर्गीयांचे हक्क नष्ट करत असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानेही कर्नाटक सरकारचा निर्णय घटनात्मकदृष्ट्या चुकीचा असल्याचे म्हटले आहे. यामुळे काँग्रेस बॅकफूटवर गेली असल्यास नवल नाही.

विविध विशेष

ज्ञानेश कुलकर्णी

खरे तर देशातील आरक्षण व्यवस्था धर्मावर आधारित नसून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित लोकांसाठी आहे. भारतामध्ये आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या मुस्लीम जातींचा समावेश ओबीसींमध्ये केला जातो. ही व्यवस्था राज्यघटनेच्या कलम १६(४) अन्वये करण्यात आली आहे. कर्नाटकसह भारतातील पाच राज्यांमध्ये सर्व मुस्लिमांना आरक्षणाचा लाभ दिला जातो. यासाठी संबंधित राज्यांमधील सर्व मुस्लिमांना ओबीसी मानण्यात आले आहे. तेलंगणातील विधानसभा निवडणुकीतही या मुद्द्याने जोर पकडला होता. देशात केंद्रीय ओबीसी यादीत किंवा राज्याच्या यादीत समावेश असणाऱ्या मुस्लीम जातींनाच आरक्षण मिळते. असे असले तरी राज्ये वेळोवेळी या याद्यांमध्ये बदल करतात आणि त्यात इतर जातींचा समावेश करतात. यामध्ये केरळ आणि तामिळनाडू आघाडीवर आहेत. याशिवाय तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकचाही या राज्यांमध्ये समावेश आहे.

आरक्षण
RESERVATION

(पान २ वर)

आजचे तापमान

कमाल
३९.२ अंश से.

किमान
२०.५ अंश से.

उठाठेव

– विवेक मेहेत्रे



बाई साहेब, ४-५ दिवसात २०-२५ ज्योतिषांना विचारून पाहिलं तेव्हा हे एक सापडले... जे मीडियासमोर 'साहेब लोकसभेत नक्की निवडून जातील!' असं सांगायला तयार आहेत!!

'समाचार'चा अंक सुरु करण्यासाठी संपर्क

दिनेश कुलथे : ९८२२०३३१४०
ऑफिस : २३४५२७०

भाजपाचे प्रभारी दिनेश शर्मा यांचा आरोप

विरोधकांकडून निवडणुकीत 'व्होट जिहाद'चा फतवा

समाचार/नगर-दि.४

लोकसभा निवडणुकीत विरोधकांना पराभव दिसत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून व्होट जिहातचा फतवा काढला जात आहे. देशातील जनतेला काँग्रेसला भडकावयाचे आहे, असा आरोप भाजपाचे महाराष्ट्र प्रभारी दिनेश शर्मा यांनी केला. या फतव्यांना आणि जिहादींना जनता मतातून विरोध करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शर्मा यांनी आज दुपारी नगरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी महाविकास आघाडीवर टीका केली. यावेळी आ. प्रा. राम शिंदे, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहरजिल्हाध्यक्ष अॅड. अभय आगरकर, वसंत लोढा, सचिन पारखी, नगरचे निवडणूक प्रभारी मनोज पानगांवकर उपस्थित होते.

शर्मा म्हणाले की, महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्कृष्टरित्या बूथ रचना केली असून, लोकसभा निवडणुकीचे सूक्ष्म नियोजन केले आहे. या निवडणुकीत महायुतीचे घटकपक्ष एकजुटीने काम करत आहेत. लोकसभा निवडणुकीत भाजपाचे ४०० पार लक्ष्य आहे. यामध्ये महाराष्ट्राचे मोठे योगदान असणार आहे. या निवडणुकीत विरोधकांचा सुपडासाफ होणार असून, जनता नवा इतिहास रचेल असे ते म्हणाले. २०१९ ला आम्हाला जनादेश **(पान ३ वर)**

शरद पवार शेवटच्या टप्प्यात अजित पवारांना आशीर्वाद देतील

बारामती लोकसभा मतदारसंघात निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात शरद पवार हे अजित पवार यांना साथ देतील, असे सांगतानाच दिनेश शर्मा यांनी बारामतीमध्ये महायुतीचा उमेदवार विजयी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला एक सुद्धा जागा मिळणार नाही. उबाठा गटाला एखादी दुसरी जागा मिळेल. तसेच विरोधकांचा या निवडणुकीत सुफडासाफ होईल, असे शर्मा म्हणाले.

अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या परप्रांतीय युवकास पोलिसांनी पकडले

समाचार/नगर-दि.४

अल्पवयीन मुलीचे पश्चिम बंगाल येथून अपहरण करणाऱ्या पश्चिम बंगाल येथील युवकास एमआयडीसी पोलिसांनी नागापूर येथून ताब्यात घेतले. प्रशांत ऊर्फ अभिजीत सजोल घोष (वय २४, रा. पश्चिम बंगाल) असे या युवकाचे नाव आहे.

एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलिस अंमलदारांनी ही कारवाई केली. १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेल्याप्रकरणी पश्चिम बंगालमधील बारबोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेबाबत बारबोणी पोलिस अधिकाऱ्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी यांच्याशी संपर्क केला होता. त्यावरून तांत्रिक विश्लेषण करून, पीडित मुलगी आणि आरोपी नागापूर परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती सपोनि चौधरी यांना मिळाली. त्यांच्या सुचनेवरून अंमलदारांनी नागापूर परिसरात पीडित मुलगी आणि **(पान ३ वर)**

शेतजमीन विकणे आहे
नेप्ती कल्याण रोड येथे
२ एकर शेतजमीन
विकणे आहे
8669663866

UNITED
PHARMA
Sargical & Generic
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon
Ves, Kedgaon
UNITED
PHARMA
9049934444
7972378081
9822020649

जागा भाड्याने / विकत देणे आहे
पाटील हॉस्पिटल ते मार्केटयार्ड रोड टच, अहमदनगर येथे
नवीन बांधकाम असलेले
3000 पासुन ते 15000 स्के. फुट
हॉस्पिटल / जिम / ऑफिसेस / रेस्टॉरन्टसाठी उपयुक्त
कर्मशियल जागा भाड्याने / विकत देणे आहे.
माहितीसाठी संपर्क - ☎ 91 300 200 55

जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह, अहमदनगर
सोनोग्राफी तपासणी रु. 500/- फक्त
प्रसुतीगृह । स्त्री रोग । वंध्यत्व निवारण । लॅप्रोस्कोपी । शासनमान्य गर्भपात केंद्र
नॉर्मल व सिझेरियन डिलिव्हरी, अत्यल्प दरात दर्जेदार सेवा
जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे,
अहमदनगर. मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.
aBhee

पाहिजेत
अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहमदनगर या मुख्य शोरुम साठी हवे आहेत
कॅशियर जागा-2 (M) | बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक
सेल्समन जागा-4 (M/F) | तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक
हेल्पर जागा-2 (M) | 10वी/12वी पास, नापास गरजुस प्राधान्य.
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता और सुंदरता साथ साथ
चंदुकाका ज्वेलर्स
– सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर ☎ 0241-2321512

नालंदा
स्कूल आणि क्लास बेंचेस
प्रायमरी, हायस्कूल आणि कॉलेजेससाठी उपयुक्त
• Strong, Sturdy & Beautiful
• Sleek & Attractive
• Powder Coated Frames
• Top & Seat Colour Choice
• Action Tessa B. S. L. Tops
संपर्क 9822294670
9890985601

ज्ञानमय, प्रेममय व सेवामय
व्यक्तिमत्व
5 मे

लोकनेते
पद्मभूषण डॉ. ए.वि. तथा बाळासाहेब विखे पाटील
आपली तत्व.. आपली शिकवण
हीच प्रेरणा आमच्या जीवनाची
क्षण न् क्षण देई आठवण
तुम्हीच शक्ती आमच्या वाटचालीची
आम्हाला आपली अनुपस्थिती जाणवते
आम्हांला आज तुम्ही हवे होता
आपल्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
दत्तात्रय गायकवाड | सुरेश गायकवाड (मा.नगरसेवक)
अॅड. शैलेश देठे । रमेश गायकवाड । सुरेशराव घोडेकर
अजित | अभिजित | अभिमन्यू
फर्म – • श्री दत्त हॉटेल अॅण्ड लॉजिंग, रेल्वे स्टेशन • सुर्या हॉटेल व परमिट रूम, रेल्वे स्टेशन
• हॉटेल स्वप्नील साई सुर्या परमिट अॅण्ड लॉजिंग, कायनेटिक चौक • सुर्या न्यूट्रिशनहब, रेल्वे स्टेशन,
AFW The Invincibles Mr.Asia AJINKYA'S FITNESS WORLD
सक्कर चौक, अहमदनगर

(पान १ वरुन)

आरक्षणाचे गाजर

विशेषत: तेलंगणामध्ये माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांना मुस्लिमांसाठी ओबीसी उपश्रेणीतील निश्चित चार टक्के आरक्षण वाढवून बारा टक्के करायचे होते. त्यांनी विधानसभेत तसा ठरावही केला होता. मात्र केंद्र सरकारने तो फेटाळला. देशातील इतर राज्यांमध्ये ही प्रणाली लागू आहे. बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसह उत्तर भारतातील सर्व राज्यांमध्ये केवळ मुस्लिमांच्या मागासलेल्या जातींनाच ओबीसी कोट्यातील आरक्षणाचा लाभ दिला जातो. असे असताना कर्नाटकमध्ये मात्र गदारोळ झाला.



कर्नाटकमध्ये आरक्षणाच्या मुद्यावरून झालेल्या गदारोळाची संहिता राज्यात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या नसतानाच्या काळातच लिहिण्यात आली आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या काही दिवस आधी माजी मुख्यमंत्री बोम्मई यांनी कर्नाटकमधील सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यातून दिलेले चार टक्के आरक्षण रद्द केले होते. राज्यातील ओबीसींसाठी राखीव असणाऱ्या ३२ टक्के कोट्यामध्ये चार टक्के अशी उपश्रेणी तयार करण्यात आली. भाजपने हा कोटा लिंगायत आणि वोक्कलिंगा समाजामध्ये विभागला. त्यानंतर देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी तेलंगणामध्ये आपले सरकार आल्यास मुस्लिमांसाठीचे चार टक्के आरक्षण रद्द करण्यात येईल, असे म्हटले होते. मात्र तिथे काँग्रेसचे सरकार आले. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द करण्याच्या भाजपच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यामुळे राज्यात नव्याने सत्तेत आलेल्या काँग्रेसला आरक्षण लागू करण्याचा अधिकार मिळाला. मागासवर्ग आयोगाच्या म्हणण्यानुसार कर्नाटक सरकारने सर्व मुस्लीम समाजाचा समावेश ओबीसींमध्ये केला आहे. याचा अर्थ कर्नाटकमध्ये आता मुस्लिमांना सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण दिले जात आहे. काँग्रेसने सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यात टाकून ओबीसी बनवले आणि या समाजातील लोकांना दिलेले आरक्षण तोडले, असा आरोप मोदी यांनी केला. या निर्णयावर राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने कर्नाटक सरकारकडून स्पष्टीकरण मागवले.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १६ नुसार प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळण्याची समान संधी असायला हवी. जात, धर्म, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर कोणाशीही भेदभाव केला जाऊ शकत नाही. अनुच्छेद १६(४) अन्वये सरकारी सेवांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळवू न शकणाऱ्या मागासवर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार राज्याला आहे. मागासवर्गीयांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती समाविष्ट आहेत. आंध्र प्रदेशमधील मुस्लिमांना एससी/एसटी आरक्षण देण्याचा प्रयत्न हा एक पायलट प्रोजेक्ट होता. काँग्रेसला संपूर्ण देशात हा प्रयत्न करायचा होता. २००४ ते २०१० या काळात काँग्रेसने आंध्र प्रदेशमध्ये चार वेळा मुस्लीम आरक्षण लागू करण्याचा प्रयत्न केला. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या सजगतेमुळे ते आपला हेतू पूर्ण करू शकले नाहीत, अशी टीका मोदी यांनी केली. हे सर्व संविधानाच्या मूळ भावनेच्या विरुद्ध असल्याचे माहीत असतानाही काँग्रेसने राजकारण आणि व्होटबँकेसाठी अनेकविध प्रयत्न केले. मुस्लीम कोटा लागू करणारे आंध्र प्रदेश हे पहिले राज्य आहे.

कर्नाटकमध्ये मुस्लीम लोकसंख्या १३ टक्के आहे. येथील मुस्लीम समाजातील सर्व जाती आणि गट सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले असल्याचे विधान योग्य नाही. मुस्लीम समाजात काही वर्ग दीर्घकाळापासून वंचित आहेत आणि त्यांना समाजातच भेदभावाचे बळी बनवले गेल्याचे आयोगाने मान्य केले आहे. मात्र यात सरसकट सगळ्यांचा समावेश होत नाही. एकूणच प्रश्न गुंतागुतीचा असला तरी आरक्षणाला विरोध आढळत आहे. मुस्लीम समाजात जातीव्यवस्था नाही, असे आयोगाने म्हटले आहे. परंतु व्यवहारात इस्लाम जातीवादापासून मुक्त आहे, असे ठामपणे सांगता येणार नाही. म्हणजेच या आरक्षणाचे विविध कंगोरे लक्षात घेऊन न्यायालयानेच निवाडा करणे आवश्यक आहे.

जाहिरातींचा सोशल इम्पॅक्ट - भाग १

जाहिरात'बाजी'

जाहिरात म्हणजे केवळ विक्री वाढवणे हा जरी उद्देश असला तरी त्यातून समाजभावना सातत्याने जागृत करत राहणे हादेखील उद्देश असतो. मग या जागृत समाजभावना उत्पादनाचा खप वाढावा म्हणून असतात किंवा एखादा दृष्टिकोन पेरण्यासाठीदेखील असू शकतात. जाहिरातींचा सामाजिक प्रभाव कसा पडत गेला ह्यावर उदाहरणातून प्रकाश टाकायचा छोटासा प्रयत्न...

जाहिरात म्हणजे थोडक्यात पण प्रभावीपणे मांडलेली कथा असते. एक अशी गोष्ट असते जी लोकांच्या पक्षी ग्राहकांच्या मनात रुजते. कधीकधी अशा जाहिरातीमुळे उत्पादनविक्री लगेचच वाढते तर कधी एखाद्या जाहिरातीचा प्रभाव अनेक वर्ष राहतो. काहीवेळा उत्पादन विकण्यापेक्षा एखादी वृत्ती, भावना, विषय लोकांपर्यंत पोहोचवून त्याला उत्पादनाशी किंवा ब्रॅण्डशी जोडून ग्राहकांच्या मनात सद्भाव रुजवणे या उद्देशाने जाहिरात केली जाते. भारतीय संस्कृती आणि परंपरा या विविधतेने नटलेल्या असल्याने काही जाहिराती या जागतिक पातळीवर प्रभावशाली बनल्या आहेत.

दो बूंद जिंदगी के – पल्स पोलिओ कॅम्पेनसाठी तयार केलेली ही टॅगलाईन पोलिओ निर्मूलनाच्या जाहिरातींचा आत्मा ठरली. १९९५ साली अँग्री यंग मॅन अमिताभला घेऊन कॅम्पेन लाँच केली गेली. धिक्कार है हम पर, पोलियो के बूथ पर इतने कम लोग? ह्या धीरगंभीर अशा डायलॉगने सुरु होणाऱ्या जाहिरातीने पोलिओ कॅम्पेन लाँच केली गेली. अमिताभचा खास असा आवाज आणि जनतेवर आरोप वाटावा अशा पद्धतीने केलेली डायलॉग डिलिव्हरी मोठा प्रभाव पाडून गेली. १९९५ ते १९९७ या दोन वर्षात टीव्ही आणि रेडिओवर ही जाहिरात सातत्याने ऐकून अनेकांनी आपल्या मुलांना पोलिओ डोस दिला. या कॅम्पेनचा रिव्ह्यू घेतल्यावर असे लक्षात आले की अमिताभ एवढं काकुळतीने, चिडून आपल्याला सांगतोय तर द्यायला हवा पोलिओ डोस ही भावना लोकांच्या मनात आली. नन्तर दो बूंद जिंदगी के या टॅगलाईनने केलेल्या जाहिराती जगात प्रसिद्ध झाल्या. जरी या जाहिरातींचा मुख्य चेहरा अमिताभ बच्चन होता तरी सोबतीला कधी जया बच्चन तर कधी सचिन तेंडुलकर, कधी ऐश्वर्या राय तर कधी ए. आर. रहमान असायचा. यत्र तत्र सर्वत्र ह्याच जाहिरातीचा मारा साधारण १५ वर्ष झाल्यावर भारतातल्या पोलिओ केसेस कमी व्हायला सुरुवात झाली. २००९ ला हजाराच्या घरात असलेल्या केसेस २०१० ला शंभराच्या घरात आल्या तर २०११ ला ही संख्या एका आकड्यावर आली. त्यानंतर दो बूंद हर बार, पोलिओपर जीत रहे बरकरार या स्लोगनने पोलिओ आणि दो बूंद यांचे नाते घट्ट केले. एखादा सामाजिक प्रश्न जाहिरातीद्वारे कशाप्रकारे सोडवला जाऊ शकतो याची सक्सेस स्टोरी म्हणजे पल्स पोलिओ मोहीम.

सामाजिक विषयावरील मुद्दे जाहिरातीमधून हायलाईट करून आपल्या ब्रॅण्डशी लोकं कायमस्वरूपी जोडली जावीत यासाठी दैनंदिन घटनांचा संदर्भ देऊन जाहिराती करण्यात आघाडीवर असणारा ब्रँड म्हणजे अमूल.

अमूल – 'द टेस्ट ऑफ इंडिया': भारताचा लाडका डेअरी ब्रँड. सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, खेळ, सिनेमा अशा विषयातल्या महत्वाच्या बातम्या घेऊन केलेली साधी सोपी जाहिरात ही अमूलची ओळख बनली.

पेट्रोलच्या किमती वाढल्या, एखाद्या सेलिब्रिटीचे निधन झाले, एखाद्या मोठ्या व्यक्तीला अटक झाली किंवा कुणाला ऑस्कर मिळाले अशा सगळ्याच पण बातमीमूल्य असलेल्या गोष्टी घेऊन जाहिरात करून लोकांच्या मनात सामाजिक संदर्भ आणि अमूल याची सांगड चतुराईने घातली गेली. ब्रँड अशा पद्धतीने लोकांच्या डोळ्यासमोर राहिला तर विक्री आपसूकच वाढते याचे अमूल हा ब्रँड उत्तम उदाहरण. व्यंगात्मक पद्धतीने समाजमनाची नाडी पकडून ब्रँड रुजवण्याचा पायंडा अमूलने पाडला.

'टाटा टी'ज – 'जागो रे' : टाटा चहाच्या 'जागो रे' जाहिरातींनी चहाचा ब्रँड आणि सामाजिक बदलासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज यातले संदर्भ अधोरेखित केले. बदल घडवण्यासाठी पहिले पाऊल मी चालले पाहिजे ही भावना सामान्यांमध्ये रुजविण्यासाठी निवडणुकींचा हंगाम या कॅम्पेनसाठी निवडला गेला. २००८–०९च्या दरम्यान ही कॅम्पेन लाँच झाली. मतदानासाठी जास्तीत जास्त लोकांनी बाहेर पडावे यासाठी काही जाहिराती विनोदी पद्धतीने दाखवल्या गेल्या तर काही लोकांच्या वृत्तीवर सणसणीत कोरडे ओढणाऱ्या पद्धतीने दाखवल्या गेल्या. 'टाटा टी पियो और जाग जाओ' अशी जाग आणणारी थीम घेऊन जाहिराती केल्या गेल्या. २०१०–११ साली इंडिया अगेन्स्ट करप्शन ही चळवळ प्रसिद्ध झालेली, त्याचा आधार घेऊन भ्रष्टाचार विरोधातली 'अब खिलाना बंद, पिलाना शुरू' ही टॅगलाईन घेऊन चहा प्या पण चहापाण्याला नका देऊ हा आशय पोहोचवला गेला. विचार करायला लावणाऱ्या जाहिरातींद्वारे, नागरिकांना सामाजिक बदलामध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. अशा मोहिमांचा प्रभाव केवळ ब्रँडपुरता मर्यादित नव्हता तर सामाजिक जागरूकता वाढवण्यातही योगदान त्यातून मिळाले.

Jahiratbaji - Samachar Article Series
जाहिरातींचा सोशल इम्पॅक्ट - भाग १

या अशा काही प्रसिद्ध भारतीय जाहिरातींनी समाजात सकारात्मक योगदान देऊन आपल्या उत्पादनाचा किंवा ब्रॅण्डचा प्रभाव पाडला आहे. जाहिरातींमध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता यामुळे अधोरेखित केली गेली. हा लेख जरा मोठा झाला असल्याने पुढल्या भागात अजून अशा काही जाहिरातींची ओळख करून दिली जाईल.

– शंतनू खानवेलकर
मो. ९८९०२५२७७१

राशीभविष्य

- **मेष** : कारकिर्दीत नव्या संधी लाभतील. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. खरेदीचा उत्साह राहील.
- **वृषभ** : कौटुंबिक प्रश्न हैराण करतील. सहकाऱ्यांशी मतभेद संभवतात. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मिथुन** : दिलासादायक घटना घडतील. तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील.
- **कर्क** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : उपजत कला–गुणांचा विकास होईल. उद्योगात संधी लाभतील. दानधर्माकडे ओढा राहील.
- **कन्या** : महत्त्वाची कामं मार्गी लागतील. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. प्रियजनांच्या भेटीचे योग आहेत.
- **तूळ** : व्यवसायात उत्कर्ष होईल. नव्या करारांना चालना मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **वृश्चिक** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. छोटा–मोठा प्रवास घडेल.
- **धनु** : सरकारी कामांना गती येईल. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. स्थावर प्रश्न मार्गी लागतील.
- **मकर** : कामाचा ताण वाढेल, जबाबदाऱ्या विचारपूर्वक स्वीकाराव्या. आर्थिक स्थिती साधारण राहील.
- **कुंभ** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. प्रश्नांमध्ये मार्ग निघेल. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळेल.
- **मीन** : मनासारख्या घटना घडतील. कार्यातील सातत्य कामी येईल. प्रगतीच्या नव्या संधी लाभतील.

सल्ला मोलाचा

प्रवासाला जाताना...

अद्याप प्रवासाचे, सहलीचे बेत आखले नसतील तर मोजके दिवस आहेत हे ध्यानात घेऊन घाई करा. आता सगळं ऑनलाईन झाल्याने भटकंतीचे बेत ठरवताना कोणताही त्रास होत नाही. गरज आहे ती भटकंतीचं काळजीपूर्वक नियोजन करण्याची. ✼ पर्यटनाचं सर्वसमावेशक पॅकेज बुक करा. भटकायला गेल्यानंतर कोणत्याही प्रकारचा खर्च तुम्हाला करावा लागणार नाही याची खात्री करून घ्या. जेवण, राहणं, खाणं, फिरणं सगळ्याचे पैसे आधीच देऊन टाका. त्यामुळे मोजके पैसे बरोबर ठेवले तरी काम भागेल. ✼ राहण्याचं बुकिंग ऑनलाईन करून टाका. फिरायच्या ठिकाणी गेल्यानंतर हॉटेल शोधायच्या फंदात पडू नका. रोख रक्कम नसल्यास तुम्ही अडचणीत येऊ शकता. ✼ आपल्या हॉटेलजवळच्या एटीएम मशीन्स आणि बँकाची माहिती घेऊन ठेवा. एटीएममध्ये कॅश आहे किंवा नाही याची माहिती देणारी ॲप्स विकसित झाली आहेत. ती डाउनलोड करून घ्या. ✼ प्रथमोपचार संच, किरकोळ आजारांची औषधं तसंच गरजेचं सामान व्यवस्थित पॅक करून घ्या. सामानाची यादी करा. पर्यटनस्थळी तातडीची खरेदी करावी लागू नये, यासाठीची तजवीज करून ठेवा.

दिनविशेष

५ मे

१९१८ : बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे निधन.
२०१३ : लडाखमधील दौलत बेग ओल्डीमधून भारत आणि चीन या दोन्ही देशांनी आपापले सैन्य मागे घेतले.
२०१५ : 'भारत–बांगलादेश जमीन सीमा करार' विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.
२०१७ : सर्वोच्च न्यायालयाकडून 'निर्भया'च्या दोषींना सुनावली गेलेली फाशीची शिक्षा कायम ठेवण्यात आली.

महत्त्वपूर्ण काही

असे हे व्हेल

ब्लू व्हेल, किलर व्हेल, हम्पबॅक व्हेल अशा व्हेलच्या अनेक प्रजाती आहेत. या प्रजातींची संख्या ८४ च्या घरात आहे. वेगवेगळ्या आकाराचे आणि प्रकारचे हे व्हेल असतात. ✼ बऱ्याच व्हेल्सना दात नसतात. बलीन नावाच्या फायबरचा वापर करून ते अन्न चावतात. ✼ व्हेल मासे गटाने राहतात. त्यात नर आणि माद्यांचा गटही असतो. ✼ व्हेल माशाच्या खालच्या ओठाची रचना अनोख्या पद्धतीने करण्यात आलीये. यामुळे त्यांच्याकडे पाहिल्यावर हसल्याचा भास होतो. ✼ व्हेलच्या कानांकडे पाहून त्यांच्या वयाचा अंदाज बांधता येतो. ✼ गंमत म्हणजे व्हेल माशांना गायला आवडतं. जोडीदाराला बोलावण्यासाठी ते गातात. गंमत म्हणून किंवा संपर्काचं माध्यम म्हणून व्हेल गाणं म्हणतात. तेच ते गाणं म्हणण्याचा त्यांना कंटाळा येतो. मग ते वेगळं गाणं म्हणतात. ✼ व्हेल मासे रस्ता चुकतात. आपण चूक केलीये हे त्यांच्या लक्षात येत नाही. दुसऱ्या ठिकाणी गेल्यावरच आपण चुकलोय हे त्यांच्या लक्षात येतं. ✼ व्हेलच्या शरीराला चिकटून अनेक जीव जगत असतात.

आरोग्यमंत्र

डेंटल एंग्झायटी आहे?

दातदुखी हे अत्यंत वेदनादायी दुखणं असून एकदा या वेदना सुरू झाल्या की रुग्ण तळमळत राहतो. एखादी वेदनाशामक गोळी घेऊन वेदना कमी करण्यावर बहुतेकांचा भर असतो. मात्र यामुळे मूळ दुखणं तसंच राहतं. रुग्ण दंतवैद्याकडे जाण्याची टाळाटाळ करत राहतो. डेंटिस्टकडे जाण्याच्या विचारानेच त्याला कापरं भरतं. तुम्हीही यातील एक असाल तर काही तरी चुकतंय, हे लक्षात घ्या. याला 'डेंटल फोबिया' असं म्हटलं जातं. अशा फोबियामुळे दंततज्ज्ञाची भेट टाळली जाते आणि हिरड्या किंवा दातांच्या वेदना सहन केल्या जातात. डेंटल एंग्झायटी आणि फोबिया हे दोन वेगळे प्रकार आहेत. डेंटल एंग्झायटी म्हणजे दंततज्ज्ञाकडे जाण्याची विचित्र भीती. दंततज्ज्ञाच्या भेटीच्या वेळी ताण येण्याला एंग्झायटी म्हणू शकतो तर फोबिया असलेल्या व्यक्तींना दातांच्या उपचारांची प्रचंड भीती वाटते. अशा व्यक्ती दंततज्ज्ञाकडे जाण्याबाबत टाळाटाळ करतात. डेंटल फोबिया किंवा एंग्झायटी असणाऱ्या व्यक्तींना हिरड्यांचे विकार, दात पडणं, दात किडणं अशा समस्या निर्माण होतात. खराब दात, हिरड्यांच्या समस्या, तोंडाला येणारी दुर्गंधी, तोंडाच्या आरोग्याची नीट काळजी न घेणं अशा कारणांमुळे अशा व्यक्तींचा आत्मविश्वास डळमळीत होतो. त्यांना असुरक्षित वाटतं. मानसिक पातळीवरही ते तणावग्रस्त होतात. या विकारांवर उपचार करणं शक्य आहे. इतर कोणत्याही मानसिक विकाराप्रमाणे यावर उपचार शक्य आहेत.

पंचांग

रविवार, ५ मे २०२४
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र कृ. १२, नक्षत्र : उ. भाद्रपदा,
चंद्रराशी : मीन, वैधृति/विष्कंभ योग
सूर्योदय : ६.११, सूर्यास्त : ७.००

फॉरवर्डस

रडू येतंय पण अश्रू लपवावे लागतात अशी वेळ फार वाईट...

सोचा ही नहीं था जिंदगी में ऐसे
भी फंसाने होंगे,
रोना भी जरुरी होगा और आँसू
भी छिपाने होंगे।

टेक्नो टॉक

फेसबुक, व्हॉट्सअॅप आदी माध्यमं आपल्या युजर्सना ब्लॉक करण्याची सुविधा उपलब्ध करून देतात. त्याचप्रमाणे जीमेलवरही ई–मेल आयडी ब्लॉक करता येऊ शकतो. ✼ जीमेल ओपन करा. आता सर्च बारमधल्या ॲरोवर क्लिक करा. ✼ एक फॉर्म ओपन होईल. जो ई–मेल आयडी ब्लॉक करायचा आहे तो इथे टाका. आता 'क्रिएट फिल्टर वुईथ धीस सर्च' या ऑप्शनवर क्लिक करून डिलिट इट हा ऑप्शन निवडा. आता क्रिएट फिल्टरवर क्लिक करा. यामुळे ब्लॉक केलेल्या ई–मेल आयडीचे मेल्स थ्रॅश फोल्डरमध्ये जातील. मेल्स ३० दिवसांनी डिलिट होतील.

करिअरवाटा

आपत्ती व्यवस्थापनातील संधी

वेगाने विकसित होणाऱ्या व्यवस्थापन क्षेत्रात कारकिर्द घडवायची असल्यास केवळ पदवी किंवा अनुभव कामी येत नाही. तर वारंवार उद्भणारे प्रश्न, नवे कायदे, नवं वातावरण याचा सतत धांडोळा घ्यावा लागतो. व्यवस्थापन शास्त्रातील नव्या ज्ञानाचं आकलन करून घेऊन रिफ्रेशर कोर्स करावे लागतात. इथं एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे रिफ्रेशर कोर्समध्ये प्रवेश घेऊ इच्छिणारे व्यवस्थापक विद्यार्थ्याप्रमाणे पूर्ण वेळ अभ्यासक्रमाला हजेरी लावू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी पार्टटाईम आणि शक्यतो कामाच्या वेळेनंतर वर्ग भरवणारे अभ्यासक्रम घेतले जातात. अलिकडे नैसर्गिक संकटांमध्ये होणारी वाढ, अपघातांची वाढती संख्या, आगीच्या वाढत्या दुर्घटना यामुळे आपत्ती व्यवस्थापनाला महत्त्व प्राप्त झालं आहे. याही क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची वानवा दिसते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये संबंधितांना विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यादृष्टीने शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम असणंही गरजेचं ठरतं. हे लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भातील अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. त्यामुळे आवड असल्यास या क्षेत्रातही काम करता येईल.ह्र

खेचाखेची

काहीही करेन पण...

गर्लफ्रेंड: जानू मी तुझ्यासाठी आगीवर चालू शकते. नदीमध्ये उडी मारु शकते.

.

बॉयफ्रेंड: मीदेखील तुझ्यावर निरातिशय प्रेम करतो. तू आत्ता भेटायला येऊ शकतेस का मला?

.

गर्लफ्रेंड: काय वेड लागलंय का, इतक्या उन्हात बाहेर पडले तर टॅन होईल ना स्किन!

वेगळं काही

बंद पडलेली गाडी आपोआप चालू लागली तर? कॅनडातल्या न्यू ब्रांसविक मधल्या मॉन्कटननावाच्या शहरात अशी एक टेकडी आहे. या टेकडीवर आलेल्या गाड्या आपोआप चालू लागतात. इथल्या जमिनीत लोहचुंबकाचे गुणधर्म असल्याने असं होतं. मॉन्कटन हे टेकड्यांचं शहर आहे. या शहरातल्या अनेक टेकड्यांमध्ये लोहचुंबकाचे गुणधर्म आहेत. या टेकडीचा शोध १९३० साली लावल्यानंतर कॅनडाला येणाऱ्या पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र बनून गेली. या टेकड्यांमधल्या लोहचुंबकाचा परिणाम गाड्यांवर तर होतोच. शिवाय आकाशात उडणाऱ्या विमानांनाही यामुळे धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच या परिसरात आल्यावर विमानांचा वेग वाढवला जातो.

संगोपन

मुलांना घडवताना...

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित होत असतात. त्यानिमित्त नातेवाईक आणि मित्रमंडळी एकत्र येतात. अशा वेळी मुलांच्या हट्टीपणामुळे रंगाचा बेरंग होऊ शकतो. हे टाळण्यासाठी मुलांना काही एटिकेट्स शिकवणं गरजेचं असतं.

✼ पाहुण्यांचं स्वागत योग्यप्रकारे कसं करायचं हे मुलांना शिकवावं. प्रत्येकाशी हसून बोलण्याचे धडे द्यावेत. ✼ पाहुण्यांनी दिलेल्या भेटवस्तूचा हसतमुखाने स्वीकार करणं आणि धन्यवाद देणं त्यांना शिकवावं. ✼ पाहुण्यांनी आणलेल्या भेटवस्तूंबाबत लगेचच कोणतीही प्रतिक्रिया देऊ नये, भेटवस्तू आवडली नसल्यास नाराजी व्यक्त करू नये, हे त्यांना समजावून सांगावं. ✼ पार्टीसाठी पाहुणे म्हणून गेल्यानंतर कसं वागावं याचेही धडे त्यांना द्यावेत. ✼ गिफ्ट देण्यासाठी मुलांना पुढाकार घेऊ द्यावा. यातूनच संवाद सुरू होतो. ✼ मुलं लवकर बोअर झाल्यास त्यांचं मन रमवण्याचा प्रयत्न करावा. कोणतंही सामान वापरण्यापूर्वी यजमानांची अनुमती घ्यायला मुलांना शिकवावं. ✼ निघताना यजमानांचा निरोप घेण्यास त्यांना शिकवावं. मोठ्यांना अभिवादन करण्यास सांगितलं जावं.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा–अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

PDF Compressor Free Version

समाचार

केवायसी तपासा!

सिक्युरिटी अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया म्हणजे सेबीच्या नवीन नियमानुसार होल्ड या प्रकारात केवायसी असणारे गुंतवणूकदार एक एप्रिल २०२४ पासून म्युच्युअल फंडात कोणतेही व्यवहार करू शकणार नाहीत. या अंतर्गत नवीन म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणे, सुरू असलेल्या एसआयपी चे हप्ते देणे, मागील काही वर्षात गुंतवणूक केलेल्या विद्यमान फंडातून पैसे काढणे यासारख्या गोष्टींचा समावेश होतो. सध्या म्युच्युअल फंडात गुंतवणुका असलेल्या पैकी जवळपास दीड कोटीच्या आसपास खात्यांमध्ये व्यवहार करण्यास अडचणी येत आहेत. मागील काळात म्युच्युअल फंडात गुंतवणूक करताना राहण्याचा पत्ता म्हणजेच ऍड्रेस प्रूफसाठी गुंतवणूकदाराचे ड्रायव्हिंग लायसन्स, बँकेच्या पासबुकची कॉपी किंवा विद्युत बिलावरील पत्ता यासारखी कागदपत्रे केवायसी मध्ये मान्य होत होती. त्यामुळे त्या प्रकारातील तसेच पॅन नंबर व आधार नंबर लिंक नसणारेसुद्धा यांना अडचणी येत आहेत. एसआयपी बंद पडल्यास (बँकेतून हप्ता न गेल्याने) प्रथम गुंतवणूकदारासच समजते म्हणून गुंतवणूकदारांनी आपली म्युच्युअल फंडातील एसआयपी किंवा गुंतवणूक नियमित जाते आहे किंवा नाही हे तपासून आपल्या सल्लागाराशी किंवा म्युच्युअल फंड वितरकाशी संपर्क करून आपली नवीन केवायसी करणे महत्त्वाचे ठरते. या सर्व प्रक्रियेत एसआयपी सारखी गुंतवणूक ऑटोमोड मध्ये असल्याने म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्यूटर किंवा सल्लागार यांना त्यांच्या क्लायंटला व्यवहारात अडचणी येत नाहीत तोपर्यंत केवायसी तपासणी अवघड असते. कारण एका डिस्ट्रीब्यूटर किंवा सल्लागाराकडे हजारो ऑटोमोड पद्धतीने चालणाऱ्या एसआयपी कार्यरत असतात. अशावेळी स्वतः इन्वेस्टरनेसुद्धा काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. भारतामध्ये म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीचे महत्त्व जसे जसे गुंतवणूकदारांना समजत आहे त्या प्रमाणात गुंतवणुका वाढत आहेत. त्यामुळे सेबीचे कायदे अधिक काटेकोर होत आहे. अंतिमतः या बाबी गुंतवणूकदाराच्या हिताच्या असल्याने केवायसी नियमाचा त्रागा करणे परवडणारे नाही.

अर्थनिती
Deshpande
Investments
The Mutual Fund House

- राजेश देशपांडे
देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर
M.9850724890

सत्यसाई सेवा समितीतर्फे सोमवारी सांस्कृतिक कार्यक्रम

समाचार/नगर-दि.४

सत्यसाई सेवा समिती नगर शाखेच्या बालविकास विभागातर्फे सोमवार दि. ६ मे रोजी सायं. ५ वा. माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, नगर येथे भगवान बाबांच्या मातोश्री ईश्वराम्मा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्री सत्यसाई बालविकास वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींचा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य असून, जास्तीत जास्त आपल्या पाल्यांसह उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजक अशोक कुरापाटी यांनी केले.

नगर येथे सोमवारपासून पोटाच्या विकारावर शिबीर

समाचार/नगर-दि.४

अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, सावेडी रोड येथे सोमवार दि.६ ते शनिवार दि.११ मे पर्यंत सकाळी ९.३० ते ५.०० या वेळेत पोटांचे विकार या विकारावर मोफत तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधीक्षक डॉ.सुनील पवार यांनी दिली.

सदर शिबिरामध्ये पोटांचे विविध विकार या आजारावर सखोल चिकित्सा करून आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत होमिओपॅथिक औषधे दिली जातील.

सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार डॉ. सुनील पवार, डॉ. कल्पना दुबे, डॉ.वैशाली काकडे, डॉ.माधुरी मोरे करणार असून आजार बरा होईपर्यंत सर्वांना मोफत होमिओपॅथिक औषधे देण्यात येतील. तसेच गरजेनुसार ई.सी.जी., रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करून या तपासण्यावर ३० सवलत दिली जाईल, असे सांगण्यात आले.

लहुजी सेना खा. सुजय विखे यांच्या प्रचारात सक्रिय

संविधानाचा खरा सन्मान भाजपाने केला- खंदारे

समाचार/नगर-दि.४

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा खरा सन्मान भारतीय जनता पक्षाच्या सरकारमध्ये झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील उपेक्षित समाजाला न्याय देणाऱ्या योजना सुरु करुन वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम केले आहे. त्यामुळेच लहुजी सेनेचे सर्व कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचार यंत्रणेत काम करत असल्याची माहिती लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुशील शिंदे तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारार्थ खंदारे यांनी विविध भागांमध्ये दौरा करुन, मतदारांशी संवाद साधला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी लहुजी सेनेची भूमिका स्पष्ट केली. महायुतीच्या उमेदवाराला लहुजी सेनेचे पुर्ण समर्थन आहे. महायुतीचे उमेदवार खा. सुजय विखे यांना विजयी करण्यासाठी लहुजी सेनेने सुध्दा जबाबदारी स्विकारली असल्याचे त्यांनी सांगितले.ज्या कॉंग्रेस पक्षाने यापूर्वी ७० ते ८० वेळा घटनेमध्ये बदल केला, त्यामुळे भाजपावर आरोप करण्याचा त्यांना कोणताही आधिकार नाही. संविधानाचा खरा सन्मान हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातच होवू शकला असे स्पष्ट करुन, लंडन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानाला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देण्याचा निर्णय, इंदु मिल येथील डॉ.आंबेडकरांचे स्मारक तसेच वस्ताद लहुजींच्या स्मारकाकरीता ५ गुंठे जमीन आणि निधीची उपलब्धता करुन, देण्याचा महत्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यामुळेच लहुजी सेनेने महायुती सरकारच्या निर्णयांचे स्वागत केले आहे, असे खंदारे यांनी सांगितले.

बाळासाहेब देशमुख यांच्या कथाकथनमध्ये रमले विद्यार्थी

समाचार/नगर-दि.४

समर्थ विद्यामंदिर सावेडी, येथे साहित्यिक व कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा 'कथाकथन' कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक डी.एम.कासार होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात कासार म्हणाले 'मुलांच्या अभ्यास, संस्काराबरोबर 'जडणघडणीला' देखील फार महत्त्व असते. हे कार्य 'कथाकथन सारख्या वेगवेगळ्या कार्यक्रमातून घडत असते. कथेतून मिळणारा बोध विद्यार्थ्यांना आयुष्याचा अर्थ उमजण्यासाठी उपयोगी पडू शकतो. त्यादृष्टीने बाळासाहेब देशमुख यांचे साहित्य लिखाण ,वास्तववादी व प्रेरणादायी आहे.

कथाकथन कार्यक्रमांमध्ये बाळासाहेब देशमुख यांनी 'अबोली' व 'किमयागार' या दोन कथा विद्यार्थी श्रोत्यांसमोर त्यांच्या विशिष्ट शैलीत कथन केल्या.

अबोली कथेतून लहान मुलांच्या मनातील विविध प्रश्न, शंका आणि त्याचे निरसन , तर किमयागार कथेतून मुलांना घडविणाऱ्या बालवाडीतील एका शिक्षिकेचे यथार्थ वर्णन करत शिक्षिकेचे लहान मुलांसंबंधीचे भावविश्व देशमुख यांनी उलगडले. सदर कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक मंत्रमुग्ध झाले होते.

कार्यक्रमात रंगले होते. सदर कार्यक्रमासाठी संस्थेतील सर्व विद्यार्थी ,शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, हजर होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पैसे आणि महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग केली परत

समाचार/नगर-दि.४

सावेडी येथील सो ॲन्ड सो शाखेचे कर्मचारी मुकुंद विटणकर (राहणार भिंगार) यांना दुकानाबाहेर च्या परिसरात काही महत्त्वाची कागदपत्रे व पैसे असलेली बॅग सापडली. पण कसलाही लोभ न बाळगता त्यांनी त्या परिसरातील लोकांकडे चौकशी केली. त्यातून त्यांना अंबाजोगाई बँकेचे कर्मचारी कराळे यांची ही बॅग असल्याचे समजले. त्यांनी बँकेचे व्यवस्थापक अबड यांच्या समक्ष ती बॅग परत दिली.

मुकुंद विटणकर यांची घरची परिस्थिती बेताची आणि त्यात पैशाची बॅग सापडणे म्हणजे नशीबच. पण या मोहाला बळी न पडता त्यांनी ती बॅग परत करून मनाचा मोठेपणा दाखविला त्यामुळे परिसरात त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. श्री कराळे यांनी त्यांना देऊ केलेले बक्षीस न स्वीकारता मुकुंद विटणकर यांनी माणुसकीचे दर्शन घडविले. त्यावेळी बँकेचे व्यवस्थापक अबड, कराळे, उषादेवी टॉवरचे शिवजीत डोके, राहुल कुलथे व सो अँड सो चे संचालक कुंतीलाल व केतन मुथा यांनी त्यांचा सत्कार केला.

बनावट कागदपत्रांच्या आधारे साडे आठ कोटींचे कर्ज

नगरच्या दोन डॉक्टरविरुध्द गुन्हा

समाचार/नगर-दि.४

स्वयंसेवी संस्थांच्या कागदपत्रांमध्ये हेराफेरी करुन त्याआधारे बँकेकडून साडेआठ कोटी रुपयांचे कर्ज परस्पर मंजूर करुन घेण्यात आले. या संदभात कोतवाली पोलिसांनी डॉ. राकेश कांतिलाल गांधी (रा. महादेव अपार्टमेंट, पाइपलाइन रस्ता, सावेडी) व डॉ. आशिष अजित भंडारी (रा. सारसनगर, नगर) या दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात अमित रसकिलाल कोठारी (रा. माणिकनगर, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीत त्यांनी नमूद केले. की सेवाभावी रेंज फाउंडेशन सोसायटी आणि बाबाजी हारजी करपे पाटील प्रतिष्ठान, आखेगाव (ता. शेवगाव) या दोन्ही स्वयंसेवी संस्था आहेत. साई एंजल स्कूल हे बाबाजी हारजी करपे पाटील प्रतिष्ठानामार्फत संचलित केले जाते. डॉ. राकेश गांधी आणि डॉ. आशिष भंडारी यांनी ९ ते १२ फेब्रुवारी २०२३ दरम्यान दोन्ही संस्थांच्या अटी - शर्तीमध्ये परस्पर बदल केले. एचडीएफसी बँकेच्या स्टेशनरस्ता शाखेत साडेआठ कोटी रुपयांचे कर्ज प्रस्ताव साई एंजल स्कुलच्या दोन मजले इमारतीच्या बांधकामासाठी सादर केला.

रेंज फाउंडेशनच्या सदस्य श्वेताअमित कोठारी आणि रसिक चंदूलाल कोठारी (मयत) यांची पूर्वपरवानगी न घेता, कोणताही ठराव न करता रेंज फाउंडेशनला जामीनदार करुन घेतले. रेंज फाउंडेशनच्या कागदपत्रांमध्ये परस्पर फेरफार करुन ती कागदपत्रे खरी आहेत, असे भासवून बँकेच्या कर्ज प्रस्तावात सादर केले. फाउंडेशनच्या विश्वस्तांचा कोणताही ठराव न करता डॉ. राकेश गांधी आणि डॉ. आशिष भंडारी यांनी स्वत:कडे फाउंडेशनचे अधिकार करुन घेतले. त्यामुळे श्वेता कोठारी, रसिक कोठारी (मयत) व आपला विश्वासघात करुन फसवणूक केली.

या संदर्भात कोतवाली पोलिसांनी विश्वासघात, फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याच्या गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक शीतल मुंगडे अधिक तपास करीत आहेत.

पान १ वरुन

निवडणुकीत 'व्होट जिहाद'चा फतवा

दिला होता. परंतु त्यांनी विश्वासघात केला. त्यामुळे या निवडणुकीत जनता त्यांना शासन करेल, अशी टीका त्यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर नाव न घेता केली. भाजपाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कायम प्राधान्य दिले आहे. विमा कवच यासह अनेक योजना त्यांनी शेतकऱ्यांसाठी राबविल्या आहेत. परंतु, विरोधकांना पराभव दिसत असल्याने त्यांनी व्होट जिहादचा फतवा काढला आहे. कॉंग्रेसला देशातील जनतेला भडकावयाचे आहे, असे फतवे आणि जिहादी वृत्तींना जनता मतातून विरोध करेल. महाराष्ट्रात महायुतीला चांगले वातावरण आहे. विकास आणि रोजगार हा भाजपाचा अजेंडा आहे. या अजेंड्यावरच मते मागितली जात आहे, असे शर्मा यांनी सांगितले.

परप्रांतीय युवकास पोलिसांनी पकडले

आरोपी युवकाचा शोध घेतला. नागापूर परिसरात पीडित मुलगी आणि आरोपी मिळून आले. या दोघांना बारबोर्णी पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती सपोनि माणिक चौधरी यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिंगार कॅम्प पोलिसांनी भिंगार शहर, मुकुंदनगर, फकीरवाडा या भागात रुटमार्च काढत शक्तीप्रदर्शन केले.

शिष्यवृत्ती परीक्षेत सय्यदमीर बाबा विद्यालयाचे यश

समाचार/नगर-दि.४

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सय्यदमीर बाबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयाच्या यशाचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षेतील निकालाने उच्चांकी पातळी गाठली आहे. एक दोन नव्हे तर तब्बल पाच विद्यार्थ्यांनी यामध्ये बाजी मारून पात्रता धारण केली आहे.

परीक्षेत यशस्वी विद्यार्थी केतन वाळके (१५८), मोहित पोकळे (१५८), धनश्री सासवडे (१४६), शौर्य खडके (१४०), पल्लवी पवार (१३४) असे एकूण पाच विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत. विद्यालयाच्या वेळे व्यतिरिक्त जादा तासिकांचे आयोजन शिक्षकांनी केल्यामुळे आज हे यश विद्यार्थ्यांना मिळाले आहे असे पालक वर्गातून म्हटले जात आहे. शिक्षक शाम निमसे यांच्यासह सर्व शिक्षकांनी त्यांना अनमोल मार्गदर्शन केल्यामुळे विद्यार्थ्यांनी यशाला गवसणी घातली आहे. अशा परीक्षांमधूनच स्पर्धा परीक्षांची तयारी होऊन विद्यार्थी सिध्द होणार आहेत. असे गौरवोद्गार संस्थेचे सर्वेसर्वा माजी आमदार भीमराव धोंडे यांनी काढले.

NMMS - परीक्षा पात्र विद्यार्थी

केतन बाबासाहेब वाळके
(गुण-१५८)

मोहित शाहिनाथ पोकळे
(गुण-१५८)

धनश्री खंडू सासवडे
(गुण-१४६)

शौर्य उद्धव खडके
(गुण-१४०)

पल्लवी राजेश पवार
(गुण-१३४)

नगर रचनाकारच नागरिकांचे भवितव्य ठरविणार - पवार

समाचार/नगर-दि.४

सरळ आणि राज्यसेवा भरतीद्वारे निवड झालेल्या ८० सहाय्यक नगर रचनाकार यांनी हिवरे बाजारला भेट देऊन विविध विकास कामांची पाहणी केली. पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले, आता भविष्यकाळात मोठ्या वेगाने शहरीकरण वाढत असून शहराचा प्लॅन व शहरातील आउटलेट यावर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता आपण घेणे गरजेचे आहे. आता शहरीकरणाचा वेग अतिशय वेगाने वाढत असून शहरातील अतिक्रमणहि तेवढ्याच प्रमाणात वाढत आहे.त्यामुळे कुठलाही प्लन मंजूर करत असताना पडणारे पावसाचे पडणारे पाणी आणि शहराचे सांडपाणी वाहून नेणारी व्यवस्था अतिक्रमणात येणार नाही याची दक्षता घेण्याची गरज आहे. अन्यथा शहरातील नागरिकांचे भवितव्य अडचणीत राहील. पोपटराव पवार यांनी नगर रचनाकारांनी हिवरे बाजार गावातील विकास कामांची माहिती दिली. याप्रसंगी यशदाचे रागिनी सावंत, सत्र संचालक व प्रसाद कुलकर्णी, सत्र सहाय्यक पुणे हे उपस्थित होते.

आनंदी जीवनावर उद्या व्याख्यान

समाचार/नगर-दि.४

नगर येथील पाईपलाईन रोड, गावडे मळा, ध्यान केंद्र हॉल येथे दि. ५ मे रोजी सायंकाळी ७ वाजता आनंदी जीवनासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. योवळी आंतरराष्ट्रीय युवा ट्रेनर, बिजनेस कोच पार्टनर, स्पिरीच्युअल आणि लाइफ कोच पार्टनर असे अनेक यशस्वी सेमिनार करणारे सलील पुळेकर मार्गदर्शन करणार आहेत. प्रेरणादायी मार्गदर्शनासाठी (मोटिवेशनल स्पीच) जास्तीत जास्त नगरवासीयांनी या शिबिरामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कृष्णा पेंडम यांनी केले आहे.

समाचार

वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

सॅम पित्रोदा यांच्या वारसा कराबाबतच्या विधानाने भारतातील लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला खमंग फोडणी दिली. हा झटका महागात पडू शकतो, हे समजल्यानंतर पित्रोदांनी पवित्रा बदलला. मुख्य मुद्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी आपल्या टिप्पण्यांना वेगळे वळण देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. वास्तवात अमेरिकेतील वारसा कराचा मुद्दा आपल्याकडे कितपत लागू का ठरतो हे समजून घेणे महत्वाचे आहे.

वारसा कराचा तापला मुद्दा



नोंद

प्रा. अशोक ढगे

निवडणुकीच्या काळात कोणतेही विधान जास्त जपून करावे लागते. आपले म्हणणे कितीही खरे असले आणि विचार कितीही क्रांतिकारी असला तरी तो समाजाच्या पचनी पडतोच असे नाही. त्यातही करांबाबत तर अधिक जागरूक राहावे लागते. निवडणुकीच्या काळात ‘ध’चा ‘मा’ करण्याचे प्रकार जाणीवपूर्वक केले जातात. त्यातून स्पर्धक राजकीय पक्षाची कोंडी करण्याचा प्रयत्न होत असतो. अलिकडेच माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या भाषणाचा आणि काँग्रेसच्या जाहीरनाम्याचा आधार घेऊन देशात संपत्ती वाटण्याच्या मुद्याचे भाजपने भांडवल केले आहे. प्रेमात आणि युद्धात सारे क्षम्य असते, असे म्हणतात. आता निवडणूक युद्धासारखीच लढवली जात असल्याने तिच्यातदेखील सारे काही क्षम्य मानले जाऊ लागले आहे. त्यात एखादा मोठा नेता विधान करून जातो आणि प्रतिस्पर्धी पक्ष त्याचा यथोचित फायदा उठवतो. नेत्याच्या विधानाशी पक्षाने कितीही फारकत घेतली, तरी ‘डॅमेज कंट्रोल’ काही होत नसते. एका अर्थी नेताच पक्षाला अडचणीत आणत असतो. आधी सोनिया गांधी, मणिशंकर अय्यर यांनी मोदी यांच्यावर केलेल्या टीकेचे बुमरँग काँग्रेसवरच उलटले होते. त्याचा नव्याने आठव झाला. मात्र या निमित्ताने या मुद्द्याचा माग काढण्याची गरज निर्माण झाली.

देशात आर्थिक विषमता टोकाची असले तरी संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे असे म्हणणे स्वप्नवत आहे. एखाद्याने कष्टाने कमावलेली संपत्ती त्याच्याकडून सहजासहजी काढून घेणे अन्यायकारक आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की आर्थिक विषमता दूर करूच नये. जादा संपत्ती राष्ट्राकडे घेतल्यानंतर तिचा उपयोग गरीबांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी होईलच असे नाही. त्यासाठी साम्यवादी देशाचा अनुभव पुरेसा बोलका आहे. श्रीमंतांवर अधिक कर लादून गरिबांच्या कल्याणाच्या योजना राबवणे हा मध्यममार्ग असतो. पण काही वेळा तोदेखील नीट वापरला जात नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्रात एखादी कररचना चांगली आहे, म्हणजे ती भारतात चांगली ठरेलच असे नाही. हे लक्षात घेऊनच सॅम पित्रोदा यांच्या वारसा कराबद्दलच्या विधानामुळे काँग्रेसला बॅकफूटवर यावे लागले. मोदी, योगी आदित्यनाथ, मायावती आदी मंडळी पित्रोदा यांच्यावर तुटून पडली. अर्थशास्त्रज्ञ, तंत्रज्ञ राजकारणी नसतात. त्यामुळेच एखादी गोष्ट सुचली तरी ती कधी आणि कशी मांडावी किंवा मांडू नये याचे भान सुटले की काय होते, हे सॅम पित्रोदा आणि काँग्रेसलाही कळले असेल. एखादे वक्तव्य केले आणि अंगलट आले की आपल्या विधानाची मोडतोड करून दाखवली, अशी नेहमीची पळवाट शोधली जाते. परंतु प्रत्येक वेळी ती उपयोगी पडतेच असे नाही.

सॅम पित्रोदा हे नाव राजकारणात नवीन नाही. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि मनमोहन सिंग यांचे सल्लागार राहिलेले पित्रोदा सध्या इंडिया ओव्हरसीज काँग्रेसचे अध्यक्ष आहेत. असे असले तरी पित्रोदा कामापेक्षा वक्तव्यामुळेच अधिक चर्चेत असतात. त्यांची विधाने काँग्रेससाठी डोकेदुखी ठरते. पक्षाला बचावाशिवाय पर्याय राहत नाही. अशी पार्श्वभूमी असताना पित्रोदा यांच्या वक्तव्याने पुन्हा एकदा काँग्रेसच्या अडचणी वाढवल्या. पित्रोदा यांनी निवडणुकीच्या काळात वारसा कराची वकिली केली. अमेरिकेत मोजक्या राज्यांमध्ये लागू असणाऱ्या या कराची वकिली करताना त्यांनी याचे रोचक वर्णन केले. वाद वाढत असल्याचे पाहून त्यांनी स्पष्टीकरण दिले. मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. ते म्हणाले, ‘अमेरिकेत वारसा कर आहे. कोणाकडे शंभर दशलक्ष डॉलर्सची संपत्ती असेल तर मृत्यूनंतर त्याची ४५ टक्के मालमत्ता मुलांना दिली जाते आणि ५५ टक्के सरकारकडे जाते. याचा सरळ अर्थ हयातीत निर्माण केलेल्या संपत्तीपैकी अर्धी संपत्ती मृत्यूनंतर जनतेसाठी सोडावी लागेल. भारतात असा कोणताही कायदा नाही.’ या वक्तव्यावर बराच वाद झाल्यानंतर पित्रोदा यांनी स्पष्टीकरण दिले. टीव्हीवरील संभाषणात मी अमेरिकेच्या वारसा कराचा केवळ उदाहरण म्हणून उल्लेख केला होता. लोकांनी अशा मुद्यांवर चर्चा आणि वादविवाद करावा, असे मी म्हटले होते; याचा काँग्रेससह कोणत्याही पक्षाच्या धोरणाशी संबंध नाही’ असे त्यांनी नंतर म्हटले.

भाजपच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जनतेला पित्रोदा यांच्या वक्तव्याचा गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले. त्यांच्या वक्तव्याच्या निमित्ताने काँग्रेसचे छुपे मनसुबे उघड झाले असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांनी अशा धोरणाबाबत काळजी घ्यावी आणि काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यातून सर्वेक्षणाचा उल्लेख मागे घ्यावा, असे आव्हान त्यांनी केले. खेरीज अल्पसंख्याकांना आपले प्राधान्य नाही. गरीब, दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांना आपले प्राधान्य आहे हे सांगण्यास ते विसरले नाहीत. अन्य काही नेत्यांनीही पित्रोदा यांच्या विधानावर टीका केली. त्यामुळे काँग्रेसची अडचण वाढली. पित्रोदा यांच्या विधानापासून काँग्रेसने दूर राहणे पसंत केले. अर्थात वादग्रस्त विधान करण्याची पित्रोदा यांची ही पहिलीच वेळ नाही. २०१९ मध्ये त्यांनी शीख दंगलीवर असेच वादग्रस्त विधान केले होते. भारतीय जनता पक्षाच्या आरोपांवर ते म्हणाले होते की, ‘१९८४ चे काय, तुम्ही तुमच्या पहिल्या पाच वर्षात काय केले याबद्दल बोला. १९८४ मध्ये झाले ते झाले...’ या विधानावर बराच गदारोळ झाला होता.

२०१९ मध्येच त्यांनी आणखी एक विधान केले होते. मध्यमवर्गीयांनी स्वार्थी नसावे, त्यांनी जास्तीत जास्त कर भरण्याची तयारी ठेवावी. तरच मध्यमवर्गीय कुटुंबांना रोजगार आणि अधिक संधी मिळतील...’ या त्यांच्या विधानामुळेही काँग्रेसच्या अडचणी वाढल्या होत्या आणि तेव्हाही त्यांच्या पक्षाला ‘डॅमेज कंट्रोल’ करावे लागले. पित्रोदा इथेच थांबले नाहीत. ते २०१९ च्या पुलवामा हल्ल्याबाबत बोलताना ते म्हणाले होते की, असे हल्ले होत राहतात. मुंबईतही हल्ला झाला होता. त्यांनी बालाकोट हवाई हल्ल्याबाबतही पुरावे मागितले होते. २०२३ मध्ये पित्रोदा यांचे आणखी एक विधान काँग्रेसच्या गळ्यातला काटा ठरले. राम मंदिराबाबत ते म्हणाले होते की, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य या समस्या मंदिरांच्या उभारणीने सुटणार नाहीत. आपल्या देशात बेरोजगारी, महागाई, शिक्षण यासारख्या समस्या आहेत; पण त्यावर कोणी बोलत नाही.’ अमेरिकेत राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पित्रोदा यांनी हे वक्तव्य केले होते. त्यांचे विधान कितीही योग्य असले तरी मंदिर आणि प्रार्थनास्थळ हा भारतीयांच्या भावनेचा विषय असतो आणि त्यांच्या भावनांना ठेच लागली की परिणाम वाईटच होतात.

वारसा करावरील अलीकडील विधानावर गदारोळ उठल्याबाबत पित्रोदा म्हणाले, ‘मी संपत्तीच्या पुनर्वितरणाबद्दल बोलतो तेव्हा नवीन धोरणे आणि नवीन कार्यक्रमांबद्दल बोलत असतो. मुख्य मुद्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी माझ्या टिप्पण्यांना वेगळे वळण देण्यात आले आहे. टीव्हीवरील संभाषणात फक्त उदाहरण म्हणून अमेरिकेच्या वारसा कराचा उल्लेख केला आहे. मी वस्तुस्थितीचा उल्लेख करू शकत नाही का? मी म्हणालो की हे असे मुद्दे आहेत; ज्यावर लोकांनी चर्चा आणि वादविवाद करावा. याचा धोरणाशी काहीही संबंध नाही. भारतात असे काहीतरी व्हायला हवे, असे कोणी म्हटले? भाजप आणि मीडिया का घाबरले आहेत?’ असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. वारसा करावरून मोदी यांनी काँग्रेसला धारेवर धरले. ‘राजपुत्र’ आणि ‘राजघराण्या’चे सल्लागार (सॅम पित्रोदा) काही काळापूर्वी म्हणाले होते की मध्यमवर्गीयांवर अधिक कर लावला पाहिजे. काँग्रेस म्हणते की, ते वारसा कर लादतील. पालकांकडून मिळालेल्या वारसा हक्कावरही कर लादला जाईल. कष्टाने जमवलेली संपत्ती मुलांना देणार नाही तर काँग्रेसचे सरकार आले तर ती तुमच्याकडून हिसकावून घेतली जाईल. त्यांनी काँग्रेसला संपत्तीचे पुनर्वितरण करण्याच्या मुद्द्याचा समावेश आपल्या जाहीरनाम्यात समाविष्ट करण्याचे आव्हान दिले. जीवनात काँग्रेसकडून लूट आणि आयुष्यानंतरही काँग्रेसकडून लूट, अशी टीका त्यांनी केली.

भाजपने आरोप केला की गांधी घराण्याने त्यांच्या मुलांसाठी आणि सुनांसाठी मोठा खजिना निर्माण केला; पण त्यांना सामान्यजनांची कष्टाची संपत्ती हिसकावून घ्यायची आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील संपत्तीच्या वाटपावरून वादाची सुरुवात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली तेव्हा सांगितले की, त्यांच्या पक्षाने देशातील विविध स्तरातील लोकसंख्येमध्ये संपत्ती वितरणाचे मूल्यांकन करण्यासाठी एक व्यापक आर्थिक आणि संस्थात्मक सर्वेक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दरम्यान, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की एकीकडे श्रीमंत आणि दुसरीकडे गरीब व मध्यमवर्ग यांच्यातील असमानता वेगाने वाढली आहे. त्यामुळे समानता, सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टांना धक्का बसला आहे. भारताच्या सर्वोच्च एक टक्क्याने कमावलेल्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आज जागतिक स्तरावर सर्वोच्च आहे. २०१४ आणि २०२३ दरम्यान असमानतेत वाढ दिसून आली. हे खरे असले तरी आर्थिक विषमता कमी कशी करायची यावर खरे तर सत्ताधारी आणि विरोधकांनी एकत्र येऊन धोरण ठरवायला हवे. मात्र त्याऐवजी असे वाद झडताना दिसतात.

प्रत्येकालाच सुख हवे असते आणि ते अक्षय रहावे अशी इच्छाही असते. मात्र अशी कामना करताना केवळ स्वत:साठी वा कुटुंबासाठी नव्हे तर संपूर्ण समाजाचे सर्व प्रकारचे स्वास्थ्य चांगले रहावे, ही इच्छा धरुन यंदाची अक्षय्य तृतीया साजरी करु या. आजही समाजात भेदाभेद आहे. उच्च-कनिष्ट भाव आहे. तशी वागणूकही दिली जाते. मात्र उद्याचा समृद्ध समाज घडवायचा असेल तर या वाईट भावनांचा क्षय व्हायला

अक्षय रहाव्यात सत्प्रवृत्ती

प्रासंगिक

डॉ. विजया वाड

ज्येष्ठ लेखिका

आपल्याकडे साडेतीन मुहूर्त अत्यंत शुभ मानले जातात. अक्षय्य तृतीया हा त्यापैकी एक. या दिवशी कोणतेही चांगले काम करण्याचा प्रारंभ करावा, असे म्हटले जाते. असे विशेष महत्त्व असल्यामुळेच या दिवशी लग्न, मुंज वा खास पूजा केल्या जातात. थोडक्यात, या दिवशी एखादे चांगले कृत्य घडावे अशी आपली इच्छा असते. अक्षय म्हणजे ज्याला क्षय नाही असा... या अर्थाने अक्षय सुख मिळावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. कोणालाच दु:ख नको असते. म्हणूनच अक्षय सुखाची कामना करत हा दिवस साजरा होतो. मात्र स्वत:साठीच नव्हे तर प्रत्येकासाठी ही कामना करावी, असे म्हणावेसे वाटते. हा केवळ आपल्यापुरते पाहण्याचा काळ नाही, याची जाणीव प्रत्येकाने ठेवायला हवी.

सर्वांसी सुख लाभावे,
जशी आरोग्यसंपदा
कल्याण व्हावे सर्वांचे
कोणी दु:खी असू नये

असे आपल्याला शाळेत शिकवले गेले आहे. डबा खाण्यापूर्वी सर्वांनी एकत्र म्हणायची ही प्रार्थना होती. आमच्याच नव्हे तर सगळ्यांनीच ही वा या अर्थाची प्रार्थना म्हटली असेल.

सर्वे भवन्तु सुखिनः
सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चिद्दुःखभाग्भवेत् ।

असेही आपण म्हणतो. ज्ञानेश्वरांनीही ‘सुखिया झाला...’ असे म्हटले आहे. अशा प्रकारे सर्व चांगल्या गोष्टी अक्षय राहण्याची कामना करणारी अक्षय्य तृतीया आहे. तिचे महत्त्व जाणून या दिवशी सगळ्यांनीच चांगली कामे करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे. समाजहिताची, समाजस्वास्थ्याची, समाजकल्याणाची कामे करणे ही आजची सगळ्यात मोठी गरज आहे. आजही जातीभेद नष्ट होण्याचा विषय ऐरणीवर येणे गरजेचे आहे. त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येत प्रयत्न करु या. हा कनिष्ठ, तो उच्च हा भेद आता तरी संपायला हवा. नाही म्हणायला आता तो कमी होतो आहे. पूर्वीपासून बाबासाहेब आंबेडकर वा त्यांच्यासारख्या समाजसुधारकांनी त्यासाठी अथक प्रयत्न केले. पण हा भेद अद्याप समूळ नष्ट झालेला नाही, ही खंत आहे. गावागावांमध्ये अजूनही जातीभेदाला प्रोत्साहन देणाऱ्या, भेदाभेदाची मुळे जपणाऱ्या घटना वा कृती आपण पाहतो. एखाद्याला वरुन पाणी देणे, तांब्याला स्पर्श न करु देणे असे प्रकार पहायला मिळतात. ते नक्कीच खुपणारे आहे. त्यामुळे यंदाची अक्षय्य तृतीया साजरी करताना हा भेदाभेद नष्ट करण्याच्या चांगल्या कामाला आपल्या सोसायटीपासूनच सुरूवात करायला हवी. सोसायटीतील सदस्यांनी कथित खालच्या व्यक्तीला पाणी दिले, आपण घरी खातो ते खायला दिले, घरात प्रवेश दिला तर बघता बघता भेदाच्या भिंती गळून पडतील. माझ्याबद्दल बोलायचे तर, सोसायटीतील गुरख्याला आमच्याकडे मुक्त प्रवेश असतो. सुरुवातीला त्याला विशेष वाटायचे. मात्र मला वा मुलींना हे खूप स्वाभाविक वाटायचे. या संस्कारातच मी मुलींना तसेच विद्यार्थ्यांना घडवले. त्यामुळेच मुलींच्याही घरात आता कोणतेही भेदभाव पाळले जात नाहीत.

सध्या विविधांगाने दु:ख आयुष्यात प्रवेश करतात. ती टाळण्यासाठी आधी आदर्श समाज घडणे गरजेचे आहे. ते साधण्यासाठी बरेच उपाय योजता येतील. उदाहरणार्थ, एक सुस्थापित, आपल्या गरजा व्यवस्थित भागवू शकणारे कुटुंब एखादे गरीब कुटुंब नक्कीच दत्तक घेऊ शकते. माझ्या मते, ही सध्याच्या भारतातील सर्वोत्तम परिस्थिती होईल. सधन कुटुंबाने एखाद्या गरजू कुटुंबाचा भार घेतला तर बघता बघता अनेक प्रश्न निकामी निघतील. शेवटी दातृत्व सगळ्यांमध्ये नसते. खरे तर अनेकांची आपल्यापुरते बघण्याचीच वृत्ती असते. मात्र ती सोडली वा कधी तरी ती सोडण्याची सक्ती केली तर समाज निश्चितच एका वेगळ्या वळणावरुन प्रवास करु लागेल.

पूर्वी अनेक घरांनी असे आदर्श घालून दिले आहेत. काळाच्या पुढे चालणारी वा स्वत:आधी समाजाचा विचार करणारी अशी अनेक घरे मी पाहिली आहेत. कित्येक घरांमध्ये आधी घरात काम करणाऱ्या सेवकवर्गाला आधी पोशाख केला जात असे आणि त्यानंतर घरातील मुलांसाठी खरेदी होत असे. या संस्कारांमधून समोर आलेले लोक आजही हे संस्स्कीर निगुतीने जपतात, कारण ते चिरंजीवी असतात. आपल्या आईवडिलांना असे वागताना पाहणारी मुले पुढील आयुष्यात त्याच संस्कार आणि शिकवणीची धुरा वाहतात. म्हणूनच आजच्या पालकांनी मुलांवर असेच संस्कार करणे गरजेचे आहे. एकीकडे सद्भावना अक्षय्य राहायला हव्यात तर दुसरीकडे गुलामगिरीच्या मानसिकतेचा क्षय व्हायला हवा. बायकांकडे बघण्याच्या वाईट दृष्टीचा क्षय व्हायला हवा. सगळी संपत्ती आपल्याकडेच हवी, या मतलबी वृत्तीचा क्षय व्हायला हवा. एखाद्याकडे वाटण्याची क्षमता नसली तर ती येनकेनप्रकारेन आणायला हवी, असे वाटते.

एकीकडे हा संपूर्ण उत्सव सामाजिक अंगाने महत्त्वाचा असतो तर दुसरीकडे उन्हाळा सुसह्य करण्यासाठी तसंच निसर्गसंवर्धनासाठीही महत्त्वपूर्ण असा असतो. पाणवठे हे सृष्टीमधील प्राणकेंद्र आहेत. पाण्याशिवाय जीवन शक्य नाही, सजीवांचं अस्तित्व शक्य नाही. म्हणूनच या दिवशी कुंभामध्ये जल घालून त्याची पूजा करतात आणि हे पाणी सगळ्यांनी प्यायचं आहे, अशी सामुदायिक भावना निर्माण करतात. याचा सरळ अर्थ म्हणजे पाण्यावर आधी सृष्टीतील सर्व प्राण्यांचा हक्क असून त्यानंतर माणसाचा हक्क आहे. आपण नेहमी वाचतो अथवा पाहतो की जंगलातले प्राणी मानवी वसाहतींकडे येऊ पहात आहेत, कारण पाणवठे उजाड झाले आहेत. असे असताना प्राण्यांची तहान कशी भागणार, हा साधा प्रश्न आहे. आजही गावागावात अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सामुदायिक पाणपोया घातल्या जातात. पहिला पाऊस पडेपर्यंत पाणपोया सुरू ठेवायच्या असतात. सगळ्या लोकांना पाणी मिळायला हवे, यात्रेकरु, वाटसरूंना पाणी मिळावे ही त्यामागील भावना असते. ठराविक लोक पाणी पुरवण्याची जबाबदारी घेतात. पाण्याच्या स्वच्छतेची काळजी घेतली जाते. कारण पाणी हे जीवन आहे तसेच तो सृष्टीमध्ये नवरस निर्माण करणारा घटक आहे. म्हणूनच शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याची दक्षता घेतली गेली तर आरोग्याचा प्रश्न सुटेल. पर्यावरण संतुलन साधले जाईल. लोकांना पाण्याची किंमत कळेल. अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने हाती घेतले जाणारे असे सगळे उपक्रम उपयुक्त ठरतील.

पाण्याबरोबरच सृष्टीची पूजा करताना आंबाच्या फळाचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा आहे. आंब्याला अमृतवृक्ष म्हणतात. हे केवळ रसापुरते फळ नाही तर तो तपश्चर्येचा वृक्ष आहे. ज्ञानाच्या संवादाचा वृक्ष आहे. पूर्वीच्या गुरुकुलातल्या चर्चा याच आम्रवृक्षाखाली होत असत. आजही मंगल कार्यात आंब्याच्या डहाळीचे प्रथम पूजन होते. आंब्याचे तोरण बांधल्याशिवाय मंगल कार्य पुढे जात नाही. या साऱ्या गोष्टीचा अर्थ एकच. आपण ज्या झाडाची फळे खातो ते आपण हयातीत लावलेच पाहिजे. पूर्वी गुरुकुलात हा नियमच होता. झाड लावल्याशिवाय तुम्हाला फळ खायचा अधिकार नाही, असे मानले जात असे. ही भावना आपल्या जगण्यातही महत्त्वाची आहे. या दिवशीचा नैवेद्य सामुदायिक असतो. तो प्रसाद म्हणून सगळ्यांना द्यायचा असतो. सृष्टीच्या पूजेला सगळ्यांना बोलवायचे असते. या सगळ्या प्रथा-परंपरांमधून आपण व्यापक होण्याचा संदेश मिळतो. संकुचितपणा नाहिसा करणे आणि व्यापक मनाने वर्तमानाला सामोरं जाणं म्हणजे अक्षय्य तृतीया होय.

थोडक्यात, नकारात्मक गोष्टींचा त्याग करुन सगळ्यांना उदात्त प्रेरणेने घेऊन पुढे जाणे म्हणजे ही तृतीया साजरी करणे. ‘मी माझ्यापुरते’ न पाहता हा ‘मी’ ‘आम्ही’ कसा होईल, याचा विचार या दिवशी करायचा असतो. अक्षय्य तृतीया हा चैत्र गौरीच्या हळदीकुंकूवाच्या समाप्तीचा दिवस असतो. चैत्र शुद्ध तृतीया ते वैशाख शुद्ध तृतीया या काळात चैत्रगौरीचे हळदीकुंकू केले जाते. यालाही एक विशिष्ट सामाजिक हेतू आहे. सर्व थरातल्या स्त्रियांनी एकत्र यावे, विचारांची देवाणघेवाण व्हावी, स्त्रियांना ज्ञानसंपन्न करावे यासाठी गौरीचे पूजन करतात. गौरी म्हणजे पार्वती आणि गौरी म्हणजेच लक्ष्मी. पार्वतीमध्ये तप आहे तर लक्ष्मीमध्ये ऐश्वर्य आहे. या दोन मूल्यांशिवाय माणसाचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होत नाही, हेच यातून सुचवायचे आहे. अक्षय्य तृतीयेच्या सणाच्या निमित्ताने मानवी जीवनाचा प्रवास तपातून झाला पाहिजे आणि त्या तपाला ऐश्वर्याची फळे लागली पाहिजेत, हा विचार दिसतो. म्हणूनच या मुहूर्तावर सोने खरेदी करतात. या मुहूर्तावर सोनेखरेदी शुभ समजली जाते. अर्थात सोने खरेदी करणे म्हणजे प्रत्यक्ष दुकानात जाऊन सोने खरेदी करणे असा अर्थ नाही तर कष्टातून आपले ऐश्वर्य वाढवण्यालाही जीवनाचे सोने करणे म्हणतात. आपल्याला साध्य करायचे आहे ते मनापासून करत, सतत सकारात्मक वृत्तीने पुढे जाणे हा अक्षय्य तृतीयेचा खरा ठेवा आहे. ही भावना जाणून घेतली तरच आपल्याला या सणाचे महत्त्व सहज लक्षात येईल.

पटावरील सरताज

भारताच्या डी गुकेशने अलिकडेच बुद्धिबळ स्पर्धेत इतिहास रचला. तो विश्वविजेतेपद पटकावणारा सर्वात तरुण आव्हानवीर ठरला. या ग्रँडमास्टरने अनुभवी गॅरी कास्पारोव्हच्या ४० वर्षांच्या जुन्या विक्रमात सुधारणा केली. ताज्या विजयासह गुकेशचा वर्षाच्या शेवटच्या तिमाहीतील विद्यमान विश्वविजेता डीइंग लिरेनसोबतचा सामना निश्चित झाला आहे. त्यामुळे हे नाव चर्चेत आहे. जाणून घेऊ बुद्धिबळाच्या पटावरील या उगवत्या ताऱ्याविषयी.

कौतुक

मंजिरी ढेरे

सध्या आपला देशच नव्हे तर अवघे जग सत्तेचा सारीपाट खेळण्यात वा हा खेळ बघण्यात दंग आहे. भारतासारखी मोठी आणि प्रबळ लोकशाही असणाऱ्या देशाबरोबरच अन्य अनेक देशांमध्ये सार्वत्रिक निवडणुका संपन्न होत असल्यामुळे हे संपूर्ण वर्ष सत्ता राखण्यात वा ओरबाडून घेण्यात जाईल आणि त्यासाठी प्यादी आपल्याला हवी तशी फिरवली जातील, यात शंका नाही. पूर्वीपासूनच युद्ध नीती, त्यातील डाव-प्रतिडाव, एकमेकांवर कुरघोड्या करणे, पेचात अडकवणे हे सगळे करण्यासाठी बुद्धिबळाचा आधार घेतला जायचा असे म्हणतात. आजच्या बदलत्या काळात प्यादी, वजीर, हत्ती-घोडे, उंट वा अगदी राजा हलवून आपले मनसुबे बुद्धिबळाच्या पटावरुन समोर आणण्याची वा संकेत देण्याची गरज उरलेली नसली तरी बुद्धीचा कस लावणारा हा खेळ आपले पूर्वीचे महत्त्व निरंतर राखून आहे. खेरीज चाणक्यांची कमतरता नसल्याने भारतीय राजकारणाबरोबरच जनसामान्यांनाही या खेळाचे आगळे अप्रूप आहे. म्हणूनच या भूमीने जगाला बुद्धिबळातील काही निष्णात खेळाडू दिले. विश्वनाथन आनंद हे एक नाव उदाहरणादाखल पुरेसे आहे. या नावाने गेली अनेक दशके पटावर अधिराज्य गाजवले आहे. आता भारताचा १७ वर्षीय ग्रँडमास्टर डी. गुकेश त्याच्या पावलावर पाऊल ठेवण्याच्या तयारीत आहे. अलिकडेच त्याने बुद्धिबळ स्पर्धेत इतिहास रचला. गुकेश विश्वविजेतेपद पटकावणारा सर्वात तरुण आव्हानवीर ठरला. या भारतीय ग्रँडमास्टरने अनुभवी गॅरी कास्पारोव्हच्या ४० वर्षांच्या जुन्या विक्रमात सुधारणा केली. या ताज्या विजयासह गुकेशचा वर्षाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये विद्यमान विश्वविजेता डिंग लिरेनसोबतचा सामना निश्चित झाला आहे. त्यामुळे सध्या हे नाव चर्चेत आहे.

डी. गुकेशने वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी जेतेपद पटकावत आपलेच नव्हे तर भारताचे नाव उज्वल केले. त्याने अमेरिकेच्या हिकारू नाकामुराचा सहज पराभव करत या यशाला गवसणी घातली. हा विजय संपादन करणारा डी. गुकेश विश्वविजेतेपद पटकावणारा सर्वात तरुण आव्हानवीर ठरला आहे. या भारतीय ग्रँडमास्टरने संभाव्य १४ पैकी नऊ गुणांसह स्पर्धेची मोहीम पूर्ण केली. या कारणास्तव वर्ल्ड चॅम्पियनमध्ये त्याचे **(पान ५ वर)**

समाचार म
साहित्य मैफल

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची कामगिरी फारच खालावली आहे. येथे प्रियांका गांधी यांना चमकदार कामगिरी करता आलेली नाही. अमेठीतील पराभवानंतर राहुल गांधी मतदारसंघाकडे फिरकले नसून प्रकृती अस्वास्थ्यामुळे सोनिया गांधींनाही रायबरेली मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता आलेला नाही. या परिस्थितीत राहुल आणि प्रियांका आता उत्तर प्रदेशवर लक्ष केंद्रीत करत आहेत. एकंदरीत, बहीण-भाऊ आता प्रतिष्ठेचीच लढाई लढत आहेत.

बहीण-भावाच्या प्रतिष्ठेची लढाई!

राज्यरंग

अजय तिवारी

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसची कामगिरी फारच खालावली आहे. समाजवादी पक्षाशी युती करूनही काही फायदा होण्याबाबत साशंकता आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीप्रसंगी उत्तर प्रदेशची जबाबदारी पेलताना प्रियांका गांधी यांना चमकदार कामगिरी करता आली नव्हती. देशातील सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातून जातो. गेल्या निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर राहुल गांधी अमेठी मतदारसंघाकडे फिरकले नाहीत तर प्रकृती अस्वास्थ्यामुळे सोनिया गांधी यांना रायबरेली मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता आला नाही. त्यातच सरकारविरोधात असल्याने त्यांना तिथे फारशी विकासकामे करता आली नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस समाजवादी पक्षाच्या साथीने १७ जागा लढवत आहे. अमेठीवर प्रियांकाचे पती रॉबर्ट वधेरा यांचा डोळा आहे. त्यांनी वारंवार निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे; परंतु कुटुंबवाद आणि घराणेशाहीची टीका तसेच राजस्थान, हरयाणातील भूखंड खरेदीचे भूत त्यांच्या मानगुटीवर कायम आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी देऊन काँग्रेस भाजपच्या हाती आयते कोलित देणार नाही. वायनाडमधील निवडणुकीत विजयाची खात्री नसल्यानेच राहुल अन्य ठिकणी उमेदवारी अर्ज दाखल करतील, अशी शंका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडे उपस्थित केली होती. एव्हाना चौथ्या टप्प्यातील निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. त्यात अमेठी आणि रायबरेली या मतदारसंघांचा समावेश आहे. राहुल आणि प्रियांकाला आता उत्तर प्रदेशमध्ये प्रचाराला वेळ मिळणार आहे. ते उमेदवार असल्यास अन्य मतदारसंघातील उमेदवारांना थोडा धीर मिळेल. त्यामुळे या दोघांनी निवडणुकीला उभे राहावे, असा सूर पक्षातून बुलंद झाला.

सोनिया गांधी यांची राज्यसभेवर निवड झाली आहे. राहुल आणि प्रियांका खासदार म्हणून निवडून आले, तर एकाच कुटुंबातील तिघे खासदार होतील आणि भाजपला कुटुंबवादाचा प्रचार करण्याची संधी मिळेल. भारतीय जनता पक्षातही एका कुटुंबात अनेक पदे आहेत. विशेषतः भाजपच्या मित्रपक्षांमध्ये तर कुटुंबवाद पुरेपूर भरला आहे; परंतु गांधी परिवाराच्या बाबतीत हा मुद्दा ठळकपणे दिसून येतो. लोकसभा निवडणुकीसाठी दोन टप्प्यांमध्ये मतदान झाले आहे. त्यानंतर अमेठी आणि रायबरेली जागांसाठी उमेदवार जाहीर करणार असल्याच्या बातम्या येत होत्या. दोन्ही जागांबाबत जोरदार चर्चा सुरू आहे. अमेठी आणि रायबरेलीमधून उमेदवार कोण, हा काँग्रेससमोरील मोठा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाचे सत्ताकेंद्र असलेल्या अमेठीतील काँग्रेस कार्यालयाचे रंगकाम सुरू आहे. 'राहुल बिन, अमेठी सून'ची पोस्टर्स तिथे दिसू लागली आहेत. नेत्यांचा मेळाही दिसू लागला आहे, कारण राहुल गांधी लवकरच अमेठीत तळ ठोकणार असून येथून निवडणूक लढवणार असल्याची बातमी आहे. खुद्द राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही तसे संकेत दिले आहेत. अमेठीबाबत मला जो काही आदेश मिळेल, तो कार्यकारिणीच्या बैठकीत ठरवला जाईल, असे राहुल यांनी मध्यंतरी म्हटले. त्याच वेळी काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनीही अमेठी आणि रायबरेलीच्या जागांबाबत सर्व काही स्पष्ट होईल, असे म्हटले आहे.

अमेठीची लढाई जिंकण्यासाठी स्मृती इराणी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. त्यांनी राम मंदिरात रामाचे दर्शन घेऊन प्रचाराची सुरुवात केली आणि अमेठीतील अनेक मंदिरांमध्ये पूजा केली. जोरदार प्रचारासोबतच स्मृती इराणी काँग्रेसवरही हल्लाबोल करत असून अमेठीतील कामांचा लेखाजोखाही मांडत आहेत. 'अमेठी ही केवळ लोकसभेची जागा नाही तर राजकारणातील गांधी कुटुंब आणि काँग्रेसच्या वर्चस्वाचा तो पुरावा आहे. संजय गांधी, राजीव गांधी आणि सोनिया गांधी हे अमेठीतून खासदार राहिले आहेत.' या शब्दांमध्ये त्यांचा प्रचार सुरु आहे. देशाच्या राजकारणात काँग्रेस शिखरावर असताना अमेठीमध्ये काँग्रेसचे नाणे वापरले जायचे. आज काँग्रेस उपेक्षित आहे आणि त्याचा परिणाम अमेठीमध्येही दिसून येत आहे. गेल्या ४२ वर्षांमध्ये अमेठीमध्ये ११ निवडणुका आणि दोन पोटनिवडणुका झाल्या आहेत. त्यापैकी ११ निवडणुका काँग्रेसने जिंकल्या. १९९८ आणि २०१९ मध्ये अमेठीतून भाजपने विजय मिळवला. त्यामुळे अमेठीतील पराभवाचे दुखणे काँग्रेसच्या मनात आहे आणि स्मृती इराणींचा उल्लेख होताच ही वेदना वाढते. स्मृती इराणी यांनी काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात काँग्रेसचे भविष्य म्हणजे राहुल गांधी यांचा पराभव केला.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने स्मृती इराणी यांना राहुल गांधी यांच्या विरोधात उभे केले होते. सत्ताविरोधी, भ्रष्टाचार, महागाई आणि यूपीए सरकारविरोधातील मोदी लाटेनंतरही राहुल गांधी यांनी अमेठीची जागा वाचवली. तथापि, २००९ मध्ये राहुल गांधींच्या विजयाचे आधीचे ३.७ लाख मतांचे अंतर २०१४ मध्ये १.०७ लाखांवर आले आणि २०१९ मध्ये स्मृती इराणी यांनी राहुल गांधींचा ५५ हजार मतांनी पराभव केला. २०१९ मध्ये स्मृती इराणी यांचा विजय हा एका निवडणुकीच्या लाटेचा परिणाम नव्हता. त्यांनी अमेठीच्या प्रत्येक भागात राहुल गांधींच्या मतदारांमध्ये पद्धतशीरपणे घुसखोरी केली. येथे २०१२ च्या विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांचे मताधिक्य कमी झाले. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत ते २५ टक्क्यांपेक्षा कमी होते. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने आतापर्यंतची सर्वात कमी १४ टक्के मतांची टक्केवारी गाठली. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने अमेठीतील दोन मतदारसंघ जिंकले. येथील जागांवर विजयाचे अंतर अंदाजे २२ हजार ते ७७ हजार होते.

मागील निवडणुकीतही राहुल गांधी अमेठीमधून निवडणूक लढण्यास फारसे इच्छुक नव्हते. २०१९ च्या निवडणुकीत स्मृती इराणी यांनी आश्वासन दिले होते की त्या अमेठीतून जिंकल्या तर जनतेला त्यांना भेटण्यासाठी दिल्लीला जावे लागणार नाही. स्मृती यांनी दोन महिन्यांपूर्वी अमेठीमध्ये घर बांधले. त्यांनी गृहप्रवेशासाठी २२ हजार लोकांना आमंत्रण पत्रे पाठवली गेली. स्मृती इराणींचा हा प्रयत्न लोकसभा निवडणुकीपूर्वी अमेठीमध्ये मोठा संदेश देणारा असल्याची चर्चा होती. इराणी यांनी २०२० ते २०२३ पर्यंत अमेठीचे डझनभराहून अधिक दौरे केले. राहुल यांनी २०१९ च्या पराभवानंतर अमेठीपासून स्वतःला दूर ठेवले. त्यांनी अमेठीला १८ डिसेंबर २०२१, २५ फेब्रुवारी २०२२ आणि त्यानंतर १९ फेब्रुवारी २०२४ अशा पाच वर्षांमध्ये केवळ तीन भेटी दिल्या. कोरोनाच्या काळात त्यांनी अमेठीमध्ये ऑक्सिजन पुरवठ्याची व्यवस्था केली होती. १६ एप्रिल रोजी राहुल यांनी केरळच्या वायनाडमध्ये केलेल्या भाषणात 'मी जेव्हाही वायनाडला येतो, तेव्हा तुम्ही मला मी घरी आलो आहे, असे भासवता' असे उद्गार काढले होते. त्यावरही इराणी यांनी टीका केली होती. १५ वर्षे जिंकल्यानंतरही राहुल अमेठीतून गायब होते आणि हरल्यानंतर पाच वर्षे पळून गेले, या शब्दांमध्ये स्मृती इराणी यांनी टीका केली. अलीकडच्या काळात वायनाडशी जवळीक दाखवण्याच्या नादात अमेठीचा पारंपारिक बालेकिल्लाही काँग्रेसच्या हातून निसटत आहे.

येथील काँग्रेसचे नेते डॉ. संजय सिंह २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपमध्ये दाखल झाले. २०१७ मध्ये अन्य ज्येष्ठ नेते जंग बहादूर सिंह यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. यंदा काँग्रेसचे माजी प्रदेश सरचिटणीस राजेश्वर सिंह यांच्यासह डझनभर काँग्रेस कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. अशा परिस्थितीत राहुल गांधी यांनी अमेठीतून निवडणूक लढवणे पक्षासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. उत्तर प्रदेशमध्ये आघाडीमध्ये काँग्रेसच्या वाट्याला १७ जागा आल्या आहेत. मात्र समाजवादी पक्षाची पारंपारिक व्होट बँक आणि केडरचा पाठिंबा मिळण्याबाबत साशंकता व्यक्त होत आहे. योगी आदित्यनाथ यांच्या उत्तर प्रदेश सरकारने अमेठीतील संजय गांधी रुग्णालय सील केले होते. उच्च न्यायालयाने हे रुग्णालय सुरू करण्याच्या सूचना अलिकडेच दिल्या. त्यामुळे सरकारच्या वृत्तीबद्दल स्थानिकांमध्ये रोष आढळला. याचा फायदा राहुल गांधींना होऊ शकतो. पक्षाच्या अंतर्गत सर्वेक्षणात राहुल यांना फायदा होईल, असे सांगितले गेले. १५ एप्रिलपूर्वी काँग्रेसने उत्तर प्रदेशमधील अमेठी आणि रायबरेली या दोन्ही जागांवर अंतर्गत सर्वेक्षण केले. त्यात पक्षाला सकारात्मक संकेत मिळाले आहेत. अहवालात दोन्ही जागांवर गांधी घराण्यातील व्यक्तींनाच उमेदवारी देण्यावर भर देण्यात आला आहे. काँग्रेसने रायबरेलीतून राहुल गांधी आणि अमेठीतून प्रियंका गांधी यांना उमेदवारी द्यावी, असा आग्रह होत आहे. रायबरेलीमध्ये भाजपने अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. या जागेवरून भारतीय जनता पक्ष वरुण गांधी यांनाही उमेदवारी देऊ शकतो, अशी चर्चा आहे. दरम्यान, पक्ष वाचवण्यासाठी आणि स्वत:बद्दल आश्वासक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने बहीण-भावाची जद्दोजहद सुरु आहे.

एव्हाना जगभरात एआयची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे. लवकरच एआय आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होणार आहे. भविष्यात रोबोट्स आपल्यासोबत आपले सहकारी म्हणून काम करतील, अशीही शक्यता आहे. त्यामुळे आपला वेळ आणि श्रम यांची बचत होईल. नवीन संधी उपलब्ध होतील आणि आपलं जीवन अधिक सुखदायी होईल. हा बदल कसा आकारला यईल? त्यामुळे कोणत्या क्षेत्रांवर परिणाम होईल?

कृत्रिम बुद्धिमत्ता अवकाश व्यापतेय...

कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआय हे शब्द आणि ही संकल्पना आता नवी राहिलेली नाही. गेल्या काही वर्षांमध्ये एआयने मोठ्या झपाट्याने जग काबीज केले आहे. इंजिनिअरिंगची एक नवी आणि लोकप्रिय शाखा बनण्याइतके एआयने नव्या-जुन्या पिढ्यांवर तंत्रज्ञानाचे गारुड केले आहे. सध्या नवीन टेक्नॉलॉजी वेगाने बदलत आहे. अवघ्या वर्षभरातच तंत्रज्ञान जुने होते आणि नवीन तंत्रज्ञान त्याची जागा घेते. आजवर फक्त माणूसच करू शकत असलेली कामेदेखील एआय करू शकत आहे. आता मशीनच माणसासारखा विचार करू लागली आहेत. वैद्यकीय क्षेत्रात आजारांचे निदान, औषधांचा शोध, शस्त्रक्रिया इत्यादी बाबतीत वित्तीय क्षेत्रात गुंतवणूक सल्लागार, फसवणूक रोखण्यासाठी एआय काम करते तर वाहतूक क्षेत्रात स्वयंचलित वाहने, वाहतूक नियंत्रण, अपघात टाळणे यासाठी याचा वापर केला जातो. ग्राहक सेवाक्षेत्रात चॅटबॉट्स, कस्टमर केअर, जाहिराती बनवणे यासाठी एआय उत्तम काम करते. टेक्स्ट एआय हे सॉफ्टवेअर तर आता जगात सगळीकडे वापरले जाऊ लागले आहे. अगदी विद्यार्थीही याचा सहज उपयोग करतात. हे खूपच दमदार माध्यम आहे, कारण ते सॉफ्टवेअर म्हणते, 'आस्क मी एनिथिंग! मला काहीही विचारा'. आपण कोणत्याही भाषेत त्याच्याशी संवाद साधू शकतो. मग आपण त्याला निसर्ग आणि मनुष्याच्या नात्यावर कविता लिहायला सांगितली की तो झटपट काव्यनिर्मिती करतो... निसर्गाने सारे दिले ते मनुष्याने हरवले, आता निसर्ग कोपला, आणि मनुष्य जागला...' वगैरे. आपण एआयला देत असलेल्या आदेशाला 'प्रॉम्पटिंग' म्हणतात. अचूक एआय प्रॉम्पटिंग करणे खूप महत्वाचे आहे. कारण प्रॉम्पटिंग जितके परफेक्ट, तितकी निर्मिती चांगली...

एआयमध्ये नव्याने समाविष्ट झालेले डेविन हे सॉफ्टवेअरदेखील तितकेच आश्चर्यकारक आहे. अमेरिकेतल्या कॉग्निशन या कंपनीने हे इंजिनिअरिंग सॉफ्टवेअर बनवले आहे. कॉग्निशनने जाहीर केले आहे की जगातला पहिला एआय सॉफ्टवेअर इंजिनियर त्यांनी तयार केला आहे. त्याचे नाव आहे डेव्हिन. हा डेव्हिन अनेक गोष्टी माणसाच्या मदतीशिवाय करू शकतो. तो कोड लिहितो. कोणतीही समस्या 'डीबग' करून 'प्रो-लेव्हल' वेबसाइट आणि व्हिडिओ तयार करू शकतो. डेव्हिनमध्ये स्वत:ची अशी एक कमांडिंग यंत्रणा आहे. त्यामध्ये शेल, कोड एडिटर आणि वेब ब्राउझर आहे. त्यामुळे तो इंजिनिअरिंगचे वेगवेगळे टास्क सॉल्व्ह करतो. आश्चर्य म्हणजे डेव्हिनने इंजिनिरअरींग जॉबसाठीचे इंटरव्ह्यूदेखील पास केले आहेत. त्यामुळे तो खऱ्याखुऱ्या सॉफ्टवेअर इंजिनियर्सची जागा घेऊ शकतो, असेही कंपनीने म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वीच केरळमधल्या एका शाळेत एका एआय शिक्षिकेचा प्रयोग यशस्वी झाला. केरळच्या तिरुवनंतपुरमच्या केटीसीटी हायर सेकेंडरी स्कूलमध्ये 'ईरीस' या फीमेल टीचर रोबोटने विद्यार्थ्यांना शिकवले. साडी नेसून मुलांना शिकवणाऱ्या 'ईरीस' मध्ये अनेक वैशिष्ट्ये दिसली. हा रोबोट आणणारी कंपनी 'मेकरलॅब्स एड्युटेक' म्हणते, ' ईरीस' ही केवळ केरळमधलीच नव्हे तर देशातली पहिली जनरेटिव्ह एआय टीचर आहे. ईरीस तीन भाषांमध्ये बोलू शकते. तिचां नॉलेज बेस चॅटजीपीटीसारख्या प्रोग्रामिंगने तयार करण्यात आला आहे. एका खऱ्याखुऱ्या शिक्षकाच्या तुलनेत तिच्याकडे जास्त माहिती आहे. अर्थात ही माहिती केवळ तिच्या मेमरी कार्डमध्ये कॉपी पेस्ट केलेली आहे. पण तिच्या शिकवण्याची पद्धत फार आवडते, असे विद्यार्थी म्हणतात. ती मुलांच्या प्रत्येक प्रश्नाचे सखोल उत्तर देते.

ओपन एआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी काही दिवसांपूर्वीच 'सोरा' या नवीन एआय टूलची माहिती दिली. त्यांनी त्यासंबंधीचा व्हिडीओदेखील शेअर केला. ते म्हणतात की 'सोरा' काय करू शकते ते तुम्हाला दाखवायला आम्हाला आवडेल. मग लोकांनी त्यांना आपण पाहू इच्छीत असलेल्या व्हिडीओंची माहिती दिली आणि त्याबरहुकूम सोराने व्हिडिओ बनवले. हे व्हिडिओ अत्यंत खरेखुरे वाटतात. ओपन एआयच्या 'सोरा'चे वैशिष्ट्य म्हणजे या टूलद्वारे कोणत्याही क्लिप किंवा फोटोशिवाय एचडी व्हिडीओ जनरेट करता येतो. म्हणजे तुम्ही फक्त टेक्स्ट म्हणजेच शब्द-वाक्य दिले की सोरा व्हिडिओ बनवू शकते. सध्या तरी ती एक मिनिटाचा व्हिडिओ बनवते आहे. हे सॉफ्टवेअर अजून सर्वत्र उपलब्ध नाही. पण लवकरच ते होईल. मग जे व्हीडिओ किंवा इमेजेस पूर्वीच उपलब्ध आहेत ते वापरुन ही सोरा अधिक लांबीचे व्हिडिओ बनवू शकेल. तरुण अमिताभ किंवा दिलीपकुमारच्या इमेजेस वापरुन, आधीच उपलब्ध असलेल्या सेट्सच्या इमेजेसचा वापर करून नवीन चित्रपटदेखील बनवता येईल.

आवाजाच्या क्षेत्रातही एआयने स्पर्श केला आहे. काही दिवसांपूर्वी 'कल हो न हो' हे सोनू निगमने म्हटलेले गाणे साक्षात किशोरकुमारच्या आवाजात व्हायरल झाले. 'ॲपो असिस्टंट' हे एक लोकप्रिय ॲप आहे. या ॲपच्या मदतीने कोडिंग, कंटेंट समरी यासारखी कामे करता येतात. हे ॲप यूजरसाठी गणितातील समस्या आणि संगीताची रचनादेखील लिहू शकते. 'चॅटऑन' या ॲप्लिकेशनच्या मदतीने लेखन रचना सुधारता येते. यूजर एखाद्या व्यवसायाशी संबंधित असेल आणि लोकांना आकर्षित करण्यासाठी चांगला मजकूर लिहायचा असेल तर या ॲपच्या मदतीने हे काम करणे अधिक सोपे झाले आहे. केवळ याच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रात एआयने प्रवेश केला आहे. शेतीच्या विकासासाठीही आता याचा वापर सुरू झाला आहे. परवडणाऱ्या ऊसशेतीसाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने मायक्रोसॉफ्ट, ऑक्स्फर्ड विद्यापीठ आणि ॲग्री पायलट एआय या जागतिक संस्थांच्या सहयोगाने कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित काटेकोर शेती तंत्रज्ञान विकसित केले आहे.

ओपन एआयला उत्तर देण्यासाठी गूगलने जेमिनी नावाचे तंत्रज्ञान आणले आहे. त्यात जेमिनी हे एक नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल आहे; जे समजून घेणे, सारांश देणे, तर्क करणे, कोडिंग आणि नियोजन करणे यासारख्या कामांमध्ये इतर मॉडेल्सपेक्षा जास्त कामगिरी करते. हे सॉफ्टवेअर प्रो, अल्ट्रा आणि नॅनो या तीन आवृत्त्यांमध्ये सादर केले गेले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात सध्या विकसित होत असलेल्या नवीन तंत्रज्ञानांमध्ये मुख्यतः गूगल, ओपन एआय, मेटा या कंपन्या आहेत. त्यांच्यातील स्पर्धा ही लोकांच्या दृष्टीने लाभदायक आहेच. पण त्याचबरोबरच काहीशी भीतीदायकही आहे. या वाढत्या स्पर्धेमुळे आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात जबरदस्त क्रांती होणार आहे, यात शंका नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात काम करणाऱ्या माणसांची गरज कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षक, चित्रकार, पत्रकार, लेखक, कवी, कॉम्प्युटर ऑपरेटर, टायपिस्ट, बॅनर मेकिंग, व्हिडिओ एडव्हरटाईजमेंट, फोटोग्राफी यासारखे अनेक जॉब आता धोक्यात येऊ शकतात. टेक्स्टचे आवाजात रूपांतर करणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कथावाचक, रेडिओ वृत्तनिवेदक, व्होकल आर्टिस्ट या मंडळींचे काम कमी झाले आहे. 'सोरा'सारख्या तंत्रज्ञानामुळे डायरेक्टर, कॅमेरामन, छोटे मोठे तंत्रज्ञ, संवाद लेखक, डबिंग आर्टिस्ट, बॉडी डबल, पटकथालेखक, भव्य दिव्य सेट उभारणारे कला दिग्दर्शक, गायक, गीतकार, संगीतकार, ध्वनी संयोजक, नृत्य दिग्दर्शक यांनाही धोका आहे.

लवकरच संशोधन क्षेत्रातही एआयचा वापर सुरू होईल आणि त्यानंतर काय घडेल याचा अंदाज आताच करणे अशक्य आहे. एआयची वाटचाल आता खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे. लवकरच एआय आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होणार आहे. भविष्यात रोबोट्स आपल्यासोबत सहकारी म्हणून काम करतील, अशी शक्यता आहेच. त्यामुळे आपला वेळ आणि श्रम यांची बचत होईल, नवीन संधी उपलब्ध होतील आणि आपले जीवन अधिक सुखदायी होईल. त्यासाठी सभोवताली घडून येत असलेले बदल बारकाईने तपासून पहायला हवेत, हे मात्र नकी.

पान ४ वरुन

पटावरील सरताज

आव्हान निश्चित झाले आहे. चेन्नईच्या डी. गुकेशने कास्पारोव्हचा विक्रम मोठ्या फरकाने मोडीत काढला. हा रशियन दिग्गज २२ वर्षांचा असताना म्हणजेच १९८४ मध्ये या सन्मानासाठी पात्र झाला होता. त्याला अनातोली कार्पोव्हचा सामना करावा लागला होता. मात्र गुकेशने वयाच्या सतराव्या वर्षीच या विक्रमाला गवसणी घातली. अर्थातच त्याच्या या विजयाने संपूर्ण भारताने आनंदोत्सव साजरा केला. विजयानंतर गुकेशने समाधान व्यक्त केले. खूप आराम आणि खूप आनंद वाटतो, हे त्याचे शब्द अपार मेहनतीची जाणीव करुन देणारे होते. मी फॅबियो कारुआना आणि इयान नेपोम्नियाचीसह या मजेदार खेळाचे अनुसरण करत होतो आणि नंतर प्रतिस्पर्धी ग्रझेगॉर्ज गजेव्स्की बरोबर फिरायला गेलो, असे सांगितले तेव्हा त्याच्यातील उमदेपणाची साक्ष पटली.

डी. गुकेशला बक्षीस म्हणून ८८,५०० युरो (सुमारे ७८.५ लाख रुपये) रोख रक्कम मिळाली आहे. उमेदवारांसाठी एकूण बक्षीस रक्कम पाच लाख युरो इतकी होती. अशा प्रकारे डी. गुकेश हा भारताचा दुसरा ग्रँडमास्टर आहे, ज्याने ही प्रतिष्ठित स्पर्धा जिंकली आहे. यापूर्वी भारताच्या महान विश्वनाथन आनंदने विजेतेपद पटकावले होते. पाच वेळा विश्वविजेता ठरलेल्या विश्वनाथन आनंदने आपल्या सोशल मीडिया हँडलवरून तरुण ग्रँडमास्टरला शुभेच्छा दिल्या. आनंदने पोस्ट केले की, 'सर्वात तरुण चॅलेंजर बनल्याबद्दल डी. गुकेशचे अभिनंदन. समस्त बुद्धिबळप्रेमींना तुम्ही केले त्याचा अभिमान आहे. तुम्ही कठीण परिस्थिती कशी खेळली आणि हाताळली हे पाहिले. याचा मला वैयक्तिकरित्या खूप अभिमान वाटतो. या क्षणाचा आनंद घ्या...' एका जाणकार आणि विश्वविजेत्या खेळाडूकडून मिळालेली ही पसंतीची थाप केवळ गुकेशसाठीच नव्हे तर सर्वच होतकरु खेळाडूंना प्रोत्साहन देणारी आहे, असे म्हणावे लागेल. गुकेशने एकतर्फी पद्धतीने सामना जिंकून हा महत्त्वपूर्ण विजय मिळवला. गुकेशला फक्त ड्रॉची गरज होती, पण नाकामुराला संधी देणे त्याला योग्य वाटले नाही. आपल्या या अद्‌भूत विजयाने गुकेशने स्पष्ट संकेत दिले होते की तो पुढील मोठ्या टप्प्यासाठी तयार आहे आणि बुद्धिबळाच्या जगात पुढचा मोठा स्टार बनण्याच्या मार्ग आता मोकळा व प्रशस्त झाला आहे. त्याला काळ्या सोंगट्यामुळे फारसा त्रास झाला नाही, कारण नाकामुराने सी वर क्वीन्स गॅम्बिट स्वीकारले पण त्याला फायदा मिळवण्याचा मार्ग सापडला नाही.

गुकेशने एक मोहरा जिंकला आणि नाकामुराला बरोबरीत आणण्यासाठी, प्रतिस्पर्ध्याचा उंटाचा खेळ संपवण्याचा मार्ग शोधावा लागला. हा सामना ७१ गेम चालला, परंतु निकालावर कधीही शंका नव्हती. गुकेशने नऊ गुण मिळवले. गुकेशच्या विजयानंतर सर्वांच्या नजरा कारुआना आणि नेपोम्नियाची यांच्यातील लढतीकडे लागल्या होत्या. दोघेही ८.५ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर राहिले. या सामन्यात त्यांच्यापैकी कोणी एक विजेता असता तर त्याचा डी. गुकेशसोबत टायब्रेकर सामना झाला असता, ज्याची गरज नव्हती. अन्य भारतीय ग्रँडमास्टरबद्दल बोलायचे तर आर प्रज्ञानंदाचे सात गुण होते आणि तो पाचव्या स्थानावर होता. विदित गुजरातीने फ्रान्सच्या फिरोझा अलिरेझासोबत झटपट बरोबरी साधली आणि सहा गुणांसह सहावे स्थान पटकावले.

डी. गुकेश गेल्या काही वर्षांपासून चर्चेचा केंद्रबिंदू आहे. त्याने वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी ग्रँडमास्टर विजेतेपद मिळवले आणि ही कामगिरी करणारा तो बुद्धिबळ इतिहासातील तिसरा सर्वात तरुण खेळाडू ठरला. गेल्या वर्षी डी. गुकेशने आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. अशा या बुद्धिबळ स्पर्धेत ऐतिहासिक विजयाची नोंद करणाऱ्या युवा भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेशचे मायदेशी परतल्यावर भव्य स्वागत करण्यात आले. टोरंटो येथील विजयानंतर रात्री उशिरा तो चेन्नईला पोहोचला आणि विमानतळावर मोठ्या संख्येने आणि प्रचंड उत्साहात चाहत्यांनी त्याचे स्वागत केले. ते सगळे गुकेशची एक झलक पाहण्यासाठी आतुर झाले होते. गुकेश शिकत असलेल्या वेलामल विद्यालयातील शेकडो विद्यार्थी सुमारे तासभर आधीपासूनच विमानतळावर त्याची वाट पाहत होते. गुकेशचे विमान उतरण्याची वेळ जवळ येऊ लागली तसतशी विमानतळावर चाहत्यांची गर्दी वाढत गेली. हा युवा बुद्धिबळपटू तीन वाजण्याच्या सुमारास विमानतळाबाहेर आला आणि लगेचच त्याला उपस्थित चाहत्यांनी घेरले. चाहत्यांनी गुकेशला पुष्पहार घातला आणि त्याला सुखरूप बाहेर काढण्यासाठी पोलिसांना कसरत करावी लागली. गुकेशच्या स्वागतासाठी त्याची आई पद्मादेखील विमानतळावर कुटुंबातील इतर सदस्यांसह उपस्थित होती. त्याची आई या मायक्रोबायोलॉजिस्ट आहे. गुकेशचे वडील रजनीकांत व्यवसायाने एएनटी सर्जन आहेत. माता-पित्यांनी गुकेशला पाठिंबा देण्यात कोणतीही कसर सोडली नव्हती. सुरुवातीपासून त्यांनी त्याच्याकडून योग्य प्रकारे सराव करवून घेतला. वडील गुकेशसोबत टोरंटोलाही गेला होता.

'जिंकणार असा विश्वास होता', असे विमानतळाबाहेर मीडियाशी बोलताना गुकेश म्हणाला. 'मायदेशी परतल्याचा खूप आनंद होत आहे, मिळालेला विजय ही माझ्यासाठी मोठी आणि विशेष उपलब्धी आहे, मी स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच सुस्थितीत होतो. ही स्पर्धा जिंकेन असा मला विश्वास होता आणि नशिबानेही चांगली साथ दिली. लोकांना बुद्धिबळाची आवड आहे हे पाहणे आनंददायी आहे. मी तामिळनाडू सरकार, अम्मा (आई), अप्पा (वडील), प्रशिक्षक, मित्र, कुटुंब, प्रायोजक आणि माझ्या शाळेचे आभार मानतो. त्यांनी ही स्पर्धा जिंकण्यासाठी मला खूप मदत केली, असे त्याने पुढे म्हटले. या विजयामुळे गुकेशला या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या सामन्यात सध्याचा विश्वविजेत्या चीनच्या डिंग लिरेनचे आव्हान पेलता येणार आहे. आता समस्त जगाचे लक्ष या आगामी लढतीकडे आणि त्यातील गुकेशच्या कामगिरीकडे लागले आहे. बुद्धिबळ साम्राज्याच्या क्षितिजावर उगवणारा हा प्रकाशमान तारा या स्पर्धेतही विलक्षण तेजाने चमकेल हीच आशा आणि सदिच्छा.

लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत इच्छुकांची 'आमदारकी'ची गणिते!

पारनेर-राहुरीसह पाथर्डी-शेवगाव, श्रीगोंदा-नगर मतदारसंघात महायुतीत रस्सीखेच होण्याची चिन्हे

नंदकुमार सातपुते

आताच्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात चांगलाच रंग भरू लागला असतानाच या निवडणुकीच्या निमित्ताने सत्तारूढ महायुती आणि विरोधी महविकास आघाडीकडून आगामी विधानसभा निवडणुकीतील उमेदवारीची गणिते निश्चित होऊ लागली आहेत. त्यातूनच आमदारकीसाठी इच्छुक उमेदवारांनी लोकसभा निवडणुकीतील आपल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर आणखी चार महिन्यांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्या-त्या मतदारसंघातील विद्यमान आमदारांसह काही नवीन चेहऱ्यांनाही उमेदवारीची संधी मिळू शकते. अर्थात संभाव्य उमेदवारीची ही गणिते लोकसभा निवडणुकीच्या निकालावरच अवलंबून राहतील. असेही आवर्जून सांगितले जात आहे.

सत्तारूढ महायुती आणि विरोधी महविकास आघाडी यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या झालेल्या नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांत दोन्ही बाजूंनी प्रचाराने चांगलाच वेग घेतला आहे. महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे आणि महविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी मतदारसंघातील गावोगावी भेटी देत मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेत प्रचारसभांचा धडाका लावला आहे. खा. विखे आणि लंके यांच्याकडून प्रचाराच्या निमित्ताने एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. दोन्ही प्रमुख उमेदवारांनी लोकसभेला आपल्यालाच अधिकाधिक मताधिक्य मिळावे, यासाठी दक्षिणेतील सर्वच विधानसभा मतदारसंघात मोर्चेबांधणी चालविली आहे. आपल्या विद्यमान आमदारांसह विरोधी गटातील नाराज नेते, पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांना गळाला लावण्याचे प्रयत्नही होत आहेत. विद्यमान आमदारांना पुन्हा उमेदवारीची खात्री देतानाच ज्या मतदारसंघात आपला आमदार नाही, तेथे विरोधी गटातील प्रमुख नाराज नेत्यांना विधानसभेला उमेदवारीचा शब्द सत्तारूढ आणि विरोधकांकडून दिला जात आहे. त्याबाबत दोन्ही उमेदवारांकडून संबंधित इच्छुक नेत्यांची पक्षाच्या प्रमुख वरिष्ठ नेत्यांशीही चर्चा घडवून आणली जात असल्याचे सांगितले जाते.

नगर दक्षिणेतील महायुतीचे उमेदवार खा. सुजय विखे यांच्या विजयासाठी महायुती ताकदीने कामाला लागली आहे. महायुतीचे घटक पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही खा. विखे यांच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेतला आहे खा. विखे हे भाजपाचे उमेदवार असल्याने नगर दक्षिणेची जागा पुन्हा आपल्याकडेच ठेवण्यासाठी जिल्हा व शहर भाजपाने कोणतीही कसर न ठेवता नेटाने प्रयत्न चालविले आहेत. राज्याचे महसूलमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी स्वतः जातीने खा. विखे यांच्या विजयासाठी लक्ष घातले आहे. मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात जात ते महायुतीच्या नेत्यांना बरोबर घेत प्रचार यंत्रणेकडे लक्ष देत आहेत. नगर दक्षिणेतील पारनेर-नगर-राहुरी, राहुरी-नगर-श्रीगोंदा, कर्जत-जामखेड या तीन विधानसभा मतदारसंघात सध्या विरोधी खा. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार असल्याने तेथे महायुतीने विशेषतः भाजपाने अधिक लक्ष केंद्रित केले आहे. अर्थात पारनेरचे आ. निलेश लंके आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन लोकसभेच्या रिंगणात उतरले आहेत. नगर शहरातील राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप हे आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबरच असल्याने महायुतीत घटक पक्ष म्हणून ते खा. सुजय विखे यांच्या बरोबरीने प्रचारात हिरीरीने सक्रिय झाले आहेत. आगामी विधानसभेसाठी आ. जगताप यांना महायुतीत राष्ट्रवादीची उमेदवारी निश्चित मानली जाते. राहुरी-नगर-श्रीगोंदा मतदारसंघात जिल्हा बँकेचे अध्यक्ष, माजी आ. शिवाजीराव कर्डिले यांनी खा. विखेंसाठी ताकद पणाला लावली आहे. या मतदारसंघात विधानसभेसाठी त्यांना भाजपाची उमेदवारीही पक्की आहे. कर्जत-जामखेड मतदारसंघात माजी मंत्री आ. राम शिंदे यांनी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर खा. विखे यांच्या प्रचारात सक्रिय होतानाच त्यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी ताकद पणाला लावली आहे. या मतदारसंघातून आ. शिंदे विधानपरिषदेची आमदारकी सोडून पुन्हा विधानसभा लढविणार की, भाजपाकडून अन्य कुणाला संधी मिळणार, हा उत्सुकतेचा विषय आहे.

शेवगाव-पाथर्डी आणि श्रीगोंदा-नगर मतदारसंघात सध्या भाजपाचेच आमदार आहेत. पाथर्डीत आ. मोनिका राजळे यांच्याबरोबरच राष्ट्रवादीचे माजी आ. चंद्रशेखर घुले यांचीही ताकद खा. विखेंच्या पाठीशी उभी आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाची उमेदवारी विद्यमान आमदार मोनिका राजळे यांनाच मिळेल, असे त्यांचे समर्थक ठामपणे सांगतात. मात्र या मतदारसंघात राष्ट्रवादीचे माजी आमदार चंद्रशेखर घुले हेही विधानसभेच्या उमेदवारीसाठी जोरदार प्रयत्न करणार, हेही निश्चित आहे. त्यामुळे पाथर्डी-शेवगाव मतदारसंघासाठी महायुतीतील भाजपा आणि राष्ट्रवादीत रस्सीखेच होऊ शकते. श्रीगोंद्यात भाजपाचे विद्यमान आमदार बबनराव पाचपुते यांच्यासह राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहटा, श्रीगोंदा कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनुराधा नागवडे यांच्यासह महायुतीचे सर्वच प्रमुख नेते खा. विखे यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. विधानसभेला मात्र या मतदारसंघातही भाजपा आणि राष्ट्रवादीत उमेदवारी मिळविण्यासाठी चढाओढ होऊ शकते. याठिकाणी भाजपाचे आ. बबनराव पाचपुते पुन्हा उमेदवारीसाठी प्रयत्न करतीलच. असे असले तरी श्रीगोंद्यात राष्ट्रवादीच्या अनुराधा नागवडे याही आमदारकीच्या उमेदवारीसाठी प्रबळ दावेदार आहेत. तेथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजेंद्र नागवडे आणि अनुराधा नागवडे यांना काँग्रेसमधून राष्ट्रवादीत घेताना काय शब्द दिला, हेही महत्त्वाचे ठरू शकते. सर्वात महत्वाचे म्हणजे खा. सुजय विखे यांनी दक्षिणेतील विरोधी महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांचे होमग्राऊंड असलेल्या पारनेर तालुक्याकडे सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी पारनेर तालुक्यात सातत्याने दोरे करताना तेथे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना बरोबर घेतानाच विरोधी नाराज नेत्यांनाही आपलेसे करण्याचा प्रयत्न चालविला. त्यातूनच माजी आमदार वसंतराव झावरे यांचे चिरंजीव आणि जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे हेही खा. सुजय विखे यांच्या प्रचारात सक्रिय झाले. सुजित झावरे यांची पारनेरच्या आमदारकीची इच्छा लपून राहिलेली नाही. हीच बाब लक्षात घेऊन पालकमंत्री विखे यांच्याकडून झावरेंना आगामी विधानसभेसाठी भाजपाच्या उमेदवारीचा शब्द दिला असण्याची शक्यता नाकारली जात नाही. अर्थात तसे झाले तर भाजपाला सहकारी घटक पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घ्यावे लागेल. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे पारनेरचे माजी आमदार, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांनीही दोन दिवसांपूर्वी आपला पक्ष आणि महाविकास आघाडीला धक्का देत महायुतीच्या खा. सुजय विखे यांना पाठिंबा दिला. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या स्वतःच्या होमग्राउंडवरच आघाडी एकसंघ नसल्याचे चित्र दिसले. मात्र शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे यांनी तातडीने पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना ही कल्पना देतानाच पारनेरमधील पक्ष पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. प्रा. गाडे यांच्या उपस्थितीत या पदाधिकाऱ्यांनी आम्हाला माजी आ. औटी यांचा निर्णय मान्य नसल्याचे सांगत आम्ही सर्व उद्धव ठाकरे यांच्याच पक्षात असल्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले. महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारात सक्रिय होत असल्याचेही या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. शिवसेना ठाकरे पक्षातून माजी आ. औटी यांचे तातडीने निलंबनही करण्यात आल्याचे प्रा. गाडे यांनी जाहीर केले त्यामुळे या निवडणुकीत माजी आ. औटी हे महायुतीच्या खा. विखे यांच्या प्रचारात तर त्यांचे शिवसेनेतील सहकारी पदाधिकारी आघाडीचे उमेदवार लंके यांच्या प्रचारात, असे चित्र पारनेर तालुक्यात दिसणार आहे. माजी आ. औटी आगामी विधानसभा निवडणुकीत पारनेर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार असतील का, याचीही चर्चा होते आहे.

महाविकास आघाडीनेही उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारासाठी मोर्चेबांधणी चालविली आहे. खा. शरद पवार यांनी या मतदारसंघात विशेष लक्ष दिले असून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आ. बाळासाहेब थोरात यांनीही लंके यांच्यासाठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सक्रिय केले आहे. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असतानाच श्रीगोंद्यात काँग्रेसचे नेते राजेंद्र नागवडे आणि अनुराधा नागवडे यांनी पक्षाला रामराम ठोकत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला. काँग्रेसला पर्यायाने आ. थोरात यांच्यासाठी हा मोठा धक्का होता. मात्र आ. थोरात यांनी तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री चंद्रशेखरराव यांच्या पक्षाचे नेते घनश्याम शेलार यांना काँग्रेसमध्ये आणून श्रीगोंद्यात पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न केला. शेलार यांनी २०१९ ची विधानसभा निवडणूक श्रीगोंदा-नगर मतदारसंघात राष्ट्रवादीच्या घड्याळ चिन्हावर लढविली होती. त्यावेळी भाजपाच्या आ. बबनराव पाचपुते यांच्याकडून ते थोडक्या मतांनी पराभूत झाले. आगामी विधानसभेच्या निवडणुकीत घनश्याम शेलार याच मतदारसंघात महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे उमेदवार असतील, अशी चर्चा सुरु झाली आहे. श्रीगोंद्यात घनश्याम शेलार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी तेथे लंके यांच्या प्रचारात सहभागी झाले आहेत. पाथर्डी – शेवगावमध्ये लंके यांच्या प्रचाराची धुरा राष्ट्रवादीचे नेते, केदारेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रताप ढाकणे, त्यांचे सहकारी कार्यकर्ते आणि महविकास आघाडीतील शिवसेना आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांवर आहे. विधानसभेला या मतदारसंघात आघाडीची उमेदवारी राष्ट्रवादीच्या प्रताप ढाकणे यांना निश्चित आहे. आता लोकसभा निवडणुकीत लंके यांच्या प्रचाराच्या निमित्ताने ढाकणे यांची आपल्या विधानसभा निवडणुकीचीही मोर्चेबांधणी चालविली आहे. राहुरी-नगर मतदारसंघात आघाडीच्यावतीने विधानसभेला राष्ट्रवादीची उमेदवारी पुन्हा विद्यमान आमदार प्राजक्त तनपुरे यांच्याच गळ्यात पडेल तर कर्जत-जामखेडमध्येही राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार रोहित पवार हेच आघाडीकडून राष्ट्रवादीचे उमेदवार असतील, हेही निश्चित आहे. नगर शहर मतदारसंघात महाविकास आघाडीची जागा राष्ट्रवादी की, शिवसेनेकडे जाते, याविषयी उत्सुकता आहे. राष्ट्रवादीचे अभिषेक कळमकर यांच्या उमेदवारीची चर्चा आतापासूनच सुरू झाली आहे.

शब्दकोडे-१७



आडवे शब्द

१) विचित्र
४) अनुमती
७) दालचिनी
९) वृद्धत्वाने त्रासलेला
१०) सर्वांना सारखे प्रमाण
१२) तमाशातील कलाकार
१६) नारळाच्या डोळ्यांची संख्या
१७) दुनिया
१९) संतापी
२१) दीवबरोबर येणारे शहर
२२) आस्था, आपलेपणा
२४) हिंदीमध्ये मे महिना
२५) कुऱ्हाड
२७) पाठवलेला
२९) झाडाची त्वचा
३०) पृथ्वी
३२) घर
३३) नंतर
३५) कोळशाची पूड
३७) परिस्थिती
४०) उदबत्ती
४२) वाळवंट
४३) समशेर
४६) लाकूड कापण्याचे हत्यार
४८) वेडावाकडा
५०) लहान, छोटा
५२) पातळसर
५४) बाण
५५) भ्रमर
५७) मृत
५८) नवरा (ग्रामीण)
६०) बारसे
६२) वेल
६४) पुरूष
६५) उगाच
६६) शरीर

उभे शब्द

१) महासर्प
२) वृद्धत्व
३) अनावस्था, अव्यवस्था
४) पुन्हा
५) उत्तराधिकारी
६) मान्यता
७) फिकीर
८) खानेसुमारी
११) कायदेशीर
१३) महिना
१४) विनोबाजींनी गीतेच्या श्लोकांचे केलेले भाषांतर
१५) दारूचा एक प्रकार
१८) विटी कोलण्याचा खड्डा
२०) यशस्वी
२३) खेकडा
२४) विरोध, मज्जाव
२६) त्वरेने, चपळाईने
२८) गंध
२९) रत्नाकर
३१) शर्करा
३२) दूर करणारा
३३) सुसर
३४) गज, एक अवाढव्य प्राणी
३६) तोफवाहक गाडी
३८) आरोळी
३९) वायू, वात
४१) भरभराट
४४) सवड
४५) खूप
४७) होडी
४८) यात्रेस जाणे
४९) हाताचा तळवा
५०) पोते
५१) पं. नेहरूंच्या पत्नीचे नाव
५३) मनात हेतू धरून केलेले काम
५६) सोने
५७) पाठीतील हाडांच्य माळेतील मणी
५९) किंमत
६१) श्रम, त्रास
६३) चांदणी

शब्दकोडे-१६ चे उत्तर

रो	ज	गा	र	ह	मी	यो	ज	ना	■	क	स	र	त
ख	ल	■	सा	र	■	ज	र	त	र	■	ट	स	र
ठो	■	सा	■	ह	र	णे	■	ल	व	क	र	■	ट
क	पा	ट	■	र	म	■	■	ग	■	मा	फ	क	■
■	ल	■	अं	म	ल	दा	र	■	पा	ल	ट	■	भा
भो	क	र	■	हा	■	■	मा	का	■	■	र	य	त
का	■	व	सु	दे	व	दे	व	की	■	ता	■	दा	■
ड	हा	ळी	■	व	र	व	र	■	स	र	स	■	का
प	र	■	श	■	■	ळी	■	व	■	■	र	प	का
स	जी	व	नि	र्जी	व	■	व	र्त	मा	न	प	त्र	■
र	त	■	वा	■	द	■	क्ष	मा	■	स	ट	■	स
णे	■	प	र	वा	न	गी	■	न	■	रु	■	भा	व
■	क	द	■	स	■	त	ड	का	फ	ड	की	■	ल
आ	व	क	जा	व	क	■	वा	ळ	■	■	र	ज	त

आपले भविष्य

दि.०५/०५/२०२४ ते ११/०५/२०२४

शिरीष कुलकर्णी
मो.नं.८७८८२६६६९०

मेष:

अपेक्षाभंगाने मानसिक संतुलन बिघडण्याची शक्यता आहे.

व्यय स्थानातील मंगळ नेत्र विकार किंवा पायाला होणाऱ्या दुखापतीचा निदर्शक आहे. नोकरदारांना खोट्या किंवा खोडसाळ आरोपांचा सामना करायला लागू शकतो. कर्जाची प्रकरणे लांबणीवर पडतील. वित्त, व्यापार किंवा बँक अशा क्षेत्रात एखाद्या अपयशाचा सामना करायला लागू शकतो. मंगळवार संसारसुखाचा आणि ऐहिक सुखाचा आनंद देणारा आहे.

वृषभ:

नोकरदारांसाठी मान सन्मानाचे प्रसंग

नोकरदारांसाठी मान सन्मानाचे प्रसंग येतील. कौटुंबिक आघाडीवर सुसंवाद आणि हास्य विनोद होतील. आर्थिक प्रगती मनासारखी झाल्याने अनेक तात्कालिक परिस्थितीजन्य ताण हलके होतील. तुमच्या राशीच्या व्ययात होणारी बुधवारची अमावस्या सढळ हाताने कौटुंबिक खर्च करवणारी आणि त्याच बरोबर भविष्यातील एखाद्या संभावनेची चिंता करायला लावणारी आहे.

मिथुन:

महिलांना मौल्यवान वस्तूंचा लाभ.

कुटुंबसुख आणि आपल्या आवडत्या वस्तूंची खरेदी करण्याचा आनंद घ्याल. महिलांना मौल्यवान वस्तूंचा लाभ होऊ शकतो. बुधवारची अमावस्या एखादी व्यावसायिक किंवा आर्थिक सुवार्ता घेऊन येईल. मित्र मैत्रिणींच्या भेटी गाठीने आनंद वृद्धिंगत होईल. सप्ताहाच्या शेवटी परोपकारी कृती कराल. आरोग्य संवर्धनात नियमितपणा ठेवा.

कर्क :

सकारात्मकता जागृत राहील.

स्वतःचे आरोग्य राखालेत तर प्रयत्नांची शिकस्त करून यशाचा पाठपुरावा करता येईल. अडचणी आणि विलंब यावर मात करत तुम्हाला आपली उद्दिष्टपूर्ती करावी लागणार आहे. दशमातील शुक्र नोकरदारांना प्रतिकूल वातावरण निर्माण करणारा असला तरी रवी भ्रमण तुम्हाला तुमच्या अधिकाराची आणि आत्मविश्वासाची जाणीव करून देईल. अमावस्या प्रगतीकारक आहे. गुरु भ्रमण सकारात्मकता जागृत ठेवेल.

सिंह :

धर्मकृत्ये श्रद्धापूर्वक कराल.

अष्टम स्थानातील मंगळ शारीरिक दुखापती करण्याची शक्यता आहे. सतर्क राहिल्यास या दुखापती टाळता येऊ शकतील. मनःस्ताप देणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. दैनंदिन धर्मकृत्ये श्रद्धापूर्वक कराल. नवोदित कलाकार आणि साहित्यक प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात येतील. सरकारी आर्थिक व्यवहार काटेकोरपणे पाळा.

कन्या :

महिला पतीच्या लहरीपणाने त्रासतील.

वाद विवादाने कौटुंबिक वातावरण गढूळ होण्याची शक्यता आहे. महिला पतीच्या लहरीपणामुळे त्रासतील. काही जणांना उदर पिडा होण्याची शक्यता आहे. अष्टम स्थानातील शुक्र ऐहिक सुखाचे आकर्षण वाढवणारा आहे. प्रतीष्ठावृद्धी करणारे प्रसंग येतील. उत्तम अर्थार्जनाने उंची वस्तूंचे व्यावसायिक आनंदतील. उत्तरार्धातील अष्टम स्थानातील अमावस्या मानसिक संतुलन घालवणारे प्रसंग आणण्याची शक्यता आहे.

तूळ :

स्वतःचे आरोग्य जपा.

तुमच्या कर्तृत्वाने आणि अधिकाराने विरोधकांना लगाम घालता येईल. प्रशंसायोग्य कार्याने कार्य सिद्धीकडे वाटचाल कराल. घरगुती प्रसंगात मात्र पत्नीच्या आडमुठेपणाची खंत वाटत राहील. पत्नीच्या अनारोग्याने घरगुती वातावरणात ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. बुधवारी होणारी अमावस्या तुमच्या राशीच्या सप्तम स्थानात होते आहे. कौटुंबिक जीवनात मनःस्ताप वाढवणारे प्रसंग येतील.

वृश्चिक :

पोटाच्या आरोग्याकडे लक्ष द्या.

घरातील लहान मुलांकडे विशेषतः त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष पालक म्हणून द्यावे लागेल. छोट्या मोठ्या विविध कौटुंबिक प्रसंगांनी स्वतःवर मानसिक ताण येण्याची शक्यता आहे. पत्नीची योग्य साथ मिळण्याची अपेक्षा राहील. नोकरी आणि व्यवसायात नवनवीन अडथळ्यांचे सत्र चालू राहील. अमावस्या दिलासादायक असली तरी स्वतःच्या आरोग्याकडे विशेषतः पोटाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्या.

धनु :

कलाकार अपेक्षित अर्थार्जन करतील

आप्त जनांशी होणारे संवाद आणि त्यांची कृती तुम्हाला मनःस्ताप देणारी आहे. आर्थिक स्थिती खंबीर असली तरी वाढते कौटुंबिक खर्च तुम्हाला त्रासदायक वाटतील. मंगळवारी तुमच्या कामाची आणि भूमिकेची प्रशंसा होईल.कलाकार अपेक्षित अर्थार्जन करतील. शेअर बाजारात सक्रीय असाल तर उत्तरार्धात मोठे व्यवहार करणे टाळा. आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

मकर :

प्रतिष्ठितांचा सहवास लाभेल.

नोकरदारांच्या हातून विक्रमी कर्तृत्व होईल. लोकांच्या मतांचा फारसा विचार न करता तुम्ही तुमच्या कार्यात मग्न रहाल. शेतकरी शेतीमालाच्या उत्पन्नाबाबत समाधानी राहतील. कौटुंबिक जीवन सुखी आणि सामाधानी राहिले तरी अमावास्येच्या आसपास अनपेक्षितपणे होणाऱ्या मतभेदातून वातावरणात ताण निर्माण होतील. गुरु भ्रमण आर्थिक उन्नती साधणारे आणि प्रतिष्ठितांचा सहवास देणारे आहे.

कुंभ :

कठीण आव्हाने स्विकाराल.

चित्त चांचल्यातून निर्णय क्षमता कमी होईल. दैनंदिन कामांना त्यामुळे विलंब होऊ शकतो. नोकरी किंवा उद्योगात अपेक्षित घटना घडतील. वरिष्ठांच्या प्रेरणेने कठीण आव्हाने स्विकाराल. तुमच्या कार्यात स्त्रियांची महत्वाची मदत होईल. अमावस्या प्रगतीकारक आणि कर्तृत्वाला प्रोत्साहन देणारी आहे. उत्तरार्धात नव्या वायासायिक संधी प्राप्त होण्याची शक्यता आहे.

मीन :

ऐहिक सुख लाभेल.

पित्त आणि उष्णतेच्या विकारांवर नियंत्रण ठेवा. प्रत्येक प्रसंगात शब्द तोलूनमापून वापरा. आपल्या बोलण्याने इतरांचे गैरसमज होण्याची शक्यता आहे. सल्ला मसलत केली तरी स्वतःचे निर्णय स्वतःच पूर्ण विचारांती घ्यावेत. टीका आणि वाद विवादाने नव्या समस्या निर्माण होण्याची भीती आहे, कौटुंबिक जीवनात ऐहिक सुख लाभेल. रसिकता वाढेल. परंतु अमावस्या खरेदीचे समाधान लाभू देणार नाही.

PDF Compressor Free Version

विविध ठराव मंजूर; जिल्हा बँकेच्या कार्यपध्दतीवर आक्षेप

पतसंस्थांच्या भवितव्यावर मेळाव्यात मंथन

समाचार/नगर-दि.४

जिल्ह्यामध्ये संपदा व इतर पतसंस्था मध्ये जे घडले त्यामुळे पतसंस्था चळवळीत संभ्रमावस्था झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशन ,अहमदनगर जिल्हा सहकारी स्थैर्यनिधी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पतसंस्थाचे अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक यांची पतसंस्था चालविताना घ्यावयाची दक्षता यावर विचार मंथन बैठक ,मेळावा नुकताच संपन्न झाला.मेळाव्यात विविध ठराव संमत करण्यात आले.

चालकांनी संस्था चालविताना
ची दक्षता या विषयावर
मंथन शिबीर
साठी
विश्वास आणि संरक्षण

मेळाव्यात जिल्ह्यातील सर्व पतसंस्थांना आर्थिक पायावर भक्कम उभे करून सहकारी पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन अहमदनगर जिल्हा सहकारी स्थैर्यनिधी संघ संयुक्तपणे प्रयत्न करीत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी दिली.काका कोयटे, निमंत्रक सुरेश वाबळे, उपाध्यक्ष वसंत लोढा, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक वासुदेव काळे व मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे , सहा निबंधक हर्षद तावरे आदी व्यासपीठावर होते. यावेळी पतसंस्थांचे ऑडिटर, कर्मचारी वर्ग,संचालकांची बेफिकिरी, कधी तपासणी करत नाही , सोने तारण आदी विषयावर चर्चा करण्यात आली.

नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यपध्दतीबददल मेळाव्यात उपस्थित सर्व पतसंस्था प्रतिनिधींकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. लोकसभेच्या निवडणुका संपल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे, जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डीले यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील पतसंस्थांचा मेळावा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील कोणतीही पतसंस्था अंशदान भरणार नाही. आम्हाला ठेव विमा संरक्षण हवे आहे. पण त्यासाठी अंशदान सक्ती करू नये. याशिवाय इतर विविध ठराव करण्यात आले.

दान मजबुरीने नाही तर मजबुतीने द्यायला पाहिजे - प्रवीणऋषीजी महाराज

आनंदधाम येथे 'दान धर्म और व्यवस्था' या विषयावर प्रवचन

समाचार/नगर-दि.४

भारतीय संस्कृतीत दान धर्माला अतिशय महत्व आहे. फक्त दान देताना मनात किंतु, परंतु नसावे. अनेकदा मनात येते आपण त्याला मदत केली पण तो आपल्याशी चांगला वागत नाही. हा भाव मनात अजिबात यायला नको. दान मजबुरीने नाही तर मजबुतीने द्यायला पाहिजे. तरच जीवनात खरा आनंद प्राप्त होईल असे मौलिक विचार उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी मांडले.

आनंदधाम येथे प्रवीणऋषीजी म. सा. यांचे 'दान धर्म और व्यवस्था' या विषयावर प्रवचन झाले. १९९८ मध्ये पूज्य प्रवीणऋषिजी महाराज गौतम निधी संकलन अभियान सुरू केले आहे. समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे, त्यांना प्रगतीसाठी प्रोत्साहन देणे या हेतूने सदर गौतम निधी संकलन केला जातो. प्रारंभी आयोजक नरेंद्र फिरोदिया, सुनील मुनोत, सी.ए.अशोक पितळे यांनी स्वागत केले. यावेळी विलास कटारिया, संतोष शेटिया, सचिन देसर्डा, प्रविण कटारिया, सुनील बोरा, स्वप्ना कटारिया, माया धोका आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रविणऋषीजी महाराज यांनी दान धर्माची महती विशद करताना सांगितले की, नदी कधी आपले पाणी पीत नाही, वृक्ष कधी आपले फळ खात नाही. त्यानुसार जो व्यक्ती तन-मन-धन इतरांना अर्पण करतो तो खरा मानव असतो. दान द्यायचे तर पूर्ण श्रध्देने द्या. भगवान श्रीकृष्णांना कोणी तरी विचारले की, कर्णाला सर्वात मोठा दानी म्हणतात, धर्मराज युधीष्ठिराला का नाही? तेव्हा श्रीकृष्ण एक गोष्ट सांगतात. एकदा सलग चार पाच दिवस अतिवृष्टी सुरू असते. एक ब्राह्मण युधिष्ठिराच्या दरबारात जातो. तो म्हणतो मला माझ्या मुलावर अग्नीसंस्कार करायचे आहेत, मला सुकलेले चंदनाचे लाकूड हवे आहेत. युधिष्ठिर म्हणतात, या वातावरणात मी सुकलेले लाकूड देऊ शकत नाही पण धन हवे तितके देऊ शकतो. ब्राह्मण धन घ्यायला नकार देत कर्णाच्या दरबारात जातो. कर्ण त्या ब्राह्मणाची मागणी ऐकून क्षणाचाही विचार न करता आपल्या दरबारातील चंदनाचे खांब तोडून ब्राह्मणाला देतो. धर्मराज युधीष्ठिराने दान देताना अट ठेवली पण कर्णाने कोणत्याही अटींविना दान दिले. म्हणून त्याला दानशूर कर्ण म्हणतात. कर्णाने अगदी आपली कवच कुंडले सुद्धा दान दिली होती. शालीभद्राचीही अशीच गोष्ट आहे. त्याची परिस्थिती चांगली नसते. त्याची आई इकडून तिकडून सामग्री जमा करून खीर बनवते. तो खीर थंड होण्याची वाट पाहत असतो. इतक्यात त्याच्या घरी साधू येतात. तो विचार करतो अर्धी खीर साधूला देऊ अर्धी माझ्यासाठी ठेवतो. पण जेव्हा तो खीर वाढतो तेव्हा सगळीच साधूला देऊन टाकतो. साधू तृप्त होऊन परत जातात. आपल्या या कृत्याबद्दल शालीभद्रच्या मनात कसलाही पश्चात्ताप, दुःख नसते. त्यामुळे शालीभद्र सारखा भाव दान देताना मनात असायला हवा.जेव्हा केव्हा दान धर्म कराल तेव्हा त्याची कुठेही वाच्यता करु नये.एकदा दान दिल्यावर पश्चात्ताप करू नये. दान गुंतवणूक नाही तर समर्पण आहे हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. गौतम निधी अभियानातून दिली जाणारी मदत मनात अहंकार आणत नाही. गौतम निधी संकलनात आज पुणे प्रथम क्रमांकावर आहे. तळेगाव ढमढेरे येथे एका व्यक्तीचे संपूर्ण घर खाक झाले होते. गौतम निधीच्या माध्यमातून त्याचे घर नव्याने उभारून देण्यात आले. गौतम निधी अभियान पिढ्यानपिढ्या चालत राहिल.

भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ

दुर्बल घटकांच्या पंखात बळ निर्माण करण्याचे काम रात्रशाळा करतात-डॉ.कोठारी

समाचार/नगर-दि.४

परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हिंद सेवा मंडळ संस्थेच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. या अभिनया अंतर्गत रात्र शाळेतील विद्यार्थी शिक्षणेदूत म्हणून करणार आहेत. शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्याचे काम करण्याची ही संकल्पना आहे.

या अभियानाचा प्रारंभ रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या उपस्थितीमध्ये झाला. यावेळी प्राचार्य सुनील सुसरे, शिक्षक महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, बाळू गोरडे, कैलास करांडे, अनिरुध्द देशमुख, अनिरुध्द कुलकर्णी, अविनाश गवळी, कैलास बालटे, महिला शिक्षिका वैशाली दुराफे, वृषाली साताळकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये गेल्या ७२ वर्षापासून शिक्षणात खंड झालेल्या, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शाळाबाह्य, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी प्रवेशित होऊन आपला शैक्षणिक स्तर उंचावलेला आहे. अनेक विद्यार्थी रात्र शाळेत शिक्षण घेऊन सक्षमपणे रोजगार करत असून, त्यांनी आपली प्रगती साधली आहे. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात शिक्षणाने बळ निर्माण करण्याचे काम ही रात्रशाळा करत आहे. आजही अनेक शाळाबाह्य विद्यार्थ्यांना रात्र शाळा ही संकल्पना माहित नाही. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रात्र शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी शिक्षणदूत होण्यासाठी पुढाकार घेतला असून, हे विद्यार्थी त्यांच्या भागातील शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. भाई सथ्था नाईट हायस्कूल मध्ये शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देखील दिले जात असून, यासाठी जन शिक्षण संस्था, सिद्धी प्यारा मेडिकल, इंडियन अॅकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंग, ट्राय लॉजिक सॉफ्ट सोल्युशन, ऐ.पी. प्रा.लि. (एमआयडीसी), ग्लोबल रिच स्किल ट्रेनिंग इंडिया प्रा.लि हे रात्र शाळेशी जोडल्या गेल्या आहेत, अशी माहिती प्राचार्य सुनील सुसरे यांनी दिला. शरद पवार, मंगेश भुते, पी.एच. शिंदे, ए.सी. ओमकार भिंगारदिवे, शिक्षिका स्वाती होले, विद्यार्थी शुभम पाचरणे यांना डॉ. कोठारी व शालेय समितीचे सदस्य विलास बडवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. शिंदे व गाडगीळ यांनी केले.

प्रभाग सहामधील महिलांशी धनश्री विखे यांनी साधला संवाद

समाचार/नगर-दि.४

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने गेल्या १0 वर्षात विकास कामांचा डोंगर उभा केला आहे. प्रत्येक घटकासाठी विविध योजना सुरु केल्या आहेत, त्याचा लाभ सर्वांना होत आहे. तेच व्हीजन डोळ्यासमोर ठेवून नगरमध्ये खा.डॉ. सुजय विखे यांनी गेल्या पाच वर्षात नगरमधील प्रलंबित प्रश्नांना चालना देत विकास साधला आहे. नगरमधील प्रभाग ६ मधील विकास कामांना निधी देऊन अनेक दिवसांपासूनचे प्रश्न त्यांच्या प्रयत्नाने मार्गी लागले आहेत. त्यामुळे जनता त्यांना पुन्हा निवडून देतील, असा विश्वास माजी नगरसेविका पल्लवी जाधव यांनी व्यक्त केला.

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांमध्ये प्रचाराचा वेग वाढू लागला असून महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांच्या पत्नी धनश्री विखे देखील प्रचारासाठी रिंगणामध्ये उतरलेल्या पाहायला मिळतात प्रभाग क्रमांक सहा शिवतीर्थ गार्डन, भारत कॉलनी, भुतकरवाडी या ठिकाणी त्यांनी महिलांशी संवाद साधला. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी नगरसेविका वंदना ताठे, प्रिया जानवे, लिलाबाई अग्रवाल व परिसरातील माता-भगिनी उपस्थित होत्या. यावेळी धनश्री विखे यांनी खा.डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या विकास कामांची माहिती देत खा.सुजय विखे यांना मोठ्या मताधक्याने विजय करण्याचा आवाहन केलं.बाबासाहेब वाकळे यांचेही भाषण झाले.

सेंट विवेकानंद स्कूलमध्ये पदवीदान समारंभ

मुलांना चाणक्यनीतीप्रमाणे वाढविण्याची गरज - अॅड. देशपांडे

समाचार/नगर-दि.४

Pre Primary Section
Graduation Ceremony

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांचा विशेषतः त्याच्या आईचा महत्वाचा रोल असतो. पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पद्धतीने अभ्यस करून द्यावा. त्यांच्यावर आपल्या अतिरिक्त अपेक्षांचा भार टाकू नका. आर्य चाणक्य सांगून गेलेत कि, वयाच्या ५ वर्षापर्यंत मुलांवर प्रेम करा, ५ ते १५ वयापर्यंत त्यांना शिस्त लावा व १५ पासून पुढे त्यांना आपले चांगले मित्र बनवा. मुलांना या चाणक्यनीति प्रमाणे वाढवल्यास ते उत्तम शिक्षण घेवून आदर्श नागरिक होवून कुटुंबाचे व शाळेचेही नाव उंचावतील यात शंकाच नाही, असे प्रतिपादन सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.किशोर देशपांडे यांनी केले.

सिंधी एज्युकेशन सोसायटीच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील युकेजी मधून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ नुकताच उत्साहात झाला. महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या पदवीदान समारंभाप्रमाणे शाळेतील सर्व बाल विद्यार्थ्यांनी काळा गाऊन व डोक्यावर टोपी परिधान केली होती. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते त्यांना पदवी प्रमाणपत्र देवून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देवून २०२४ च्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहात समारोप करण्यत आला.

सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.किशोर देशपांडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिंधी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राम मेंघानी होते. यावेळी सचिव सिए. महेश मध्यान, खजिनदार सुरेश हिरानंदानी, हायस्कूलच्या प्राचार्य गीता तांबे, माध्यमिकच्या प्राचार्य कांचन पापडेचा, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी आदींसह सर्व शिक्षक, पदवी घेणारे विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

सीए महेश मध्यान यांचे भाषण झाले. माध्यमिकच्या प्राचार्य कांचन पापडेचा यांनी प्रास्ताविक केले. हायस्कूलच्या प्राचार्य गीता तांबे यांनी शाळेच्या उपक्रमांची माहिती दिली तसेच प्राथमिकच्या मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तनी यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाची माहिती दिली.

मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नाही - बाळकृष्ण सिद्धम

समाचार/नगर-दि.४

मार्कंडेय मंदिर जीर्णोद्धार सोहळा बेकायदेशीर व तथाकथित लोकांनी आयोजित केलेला आहे याच्या नावाखाली पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ व मार्कंडेय विद्यालय यांच्या ताब्यात वर्षानुवर्ष असलेल्या इमारती पाडण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे या शाळेमध्ये सुमारे १५00 ते १७00 विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तसेच धर्मदाय आयुक्त पुणे आणि नगर यांच्या कोर्टात अर्ज आधीपासून प्रलंबित असल्या कारणाने कोणत्याही प्रकारचे बांधकाम न करण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्याची माहिती शरद क्यादर यांनी दिली.

गांधी मैदान येथील मार्कंडेय मंदिर येथे बेकायदेशीर लोकांकडून स्वयंघोषित ट्रस्टी यांच्यामार्फत जीर्णोद्धार करण्याचे ठरले आहे. मात्र या ठिकाणी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची मार्कंडेय शाळा असून समन्वयाने प्रश्न मार्गी लागावा यासाठी मंदिर जीर्णोद्धाराचे समन्वयक श्रीकांत छिंदम व मुख्याध्यापक संदीप छिंदम यांच्या उपस्थितीत समाजाची बैठक संपन्न झाली त्यामध्ये शाळेला जागा द्यावी व बांधकाम करताना मंदिर व शाळेच्या बांधकामाचे प्लॅन एकत्र मंजुरीसाठी पाठवण्यात यावे आणि एकत्र बांधकाम सुरू करावे. तसेच देवस्थान व शाळा यांच्यात बांधकामाबाबत करार करण्यात यावा असे ठरले होते. हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी पद्मशाली समाजाच्या अनेक वेळा बैठका संपन्न झाल्या मात्र मूळ प्रश्न बाजूला ठेवून समाजाची दिशाभूल करण्याचे काम करण्यात येत असून पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचा मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नसून बेकायदेशीर स्वयंघोषित ट्रस्टला विरोध आहे अशी माहिती पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी दिली

गांधी मैदान येथील मार्कडेय मंदिराबाबत पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची बैठक संपन्न झाली यात अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी माहिती दिली यावेळी सचिव डॉ.रत्ना बल्लाळ, शरद क्यादर, राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, मुख्याध्यापक संदीप छिंदम आदी उपस्थित होते.

शरद क्यादर म्हणाले की मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट या संस्थेवर आज अखेर कोणीही अधिकृत ट्रस्टी व पदाधिकारी नाहीत मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट यांच्याबद्दल अर्ज उपधर्मादाय आयुक्त अहमदनगर यांनी कायदेशीर फेटाळला आहे असे असताना पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या विरोधात काम करणारे काही लोक व विरोधी गटातील काही विघ्नसंतोषी लोक एकत्र येत त्यांनी निवडणूक घेतल्याची बनावट कागदपत्रे तयार करून तसा अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात दाखल केलेला आहे त्या अर्जावर हरकत घेतलेली असतानाही आम्हाला असे समजते की काही स्वयंघोषित विश्वस्त यांनी विघ्नसंतोषी लोकांना हाताशी धरून चुकून धर्मदाय आयुक्त यांच्या परिशिष्ट १ वर नाव असल्याचा गैरफायदा घेत एका ८५ वर्षीय वृद्ध इसमाची फसवणूक करत महापालिकेच्या बांधकाम परवानगी अर्जावर सही घेतली. तसेच परवानगीसाठी अर्ज सादर करताना खोटे कागदपत्रे सादर करून आयुक्त अहमदनगर महापालिका यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळवली, मात्र कोणत्याही धर्मदाय संस्थेच्या मालमत्तेची विक्री, सुधारणा, जीर्णोद्धार करायचा असल्यास धर्मदाय आयुक्त यांच्याकडे लेखी अर्ज सादर करून त्याची लेखी परवानगी घेऊन त्यानंतरच बांधकाम परवानगी मिळते पण मार्कंडेय मंदिर देवस्थान यांनी अशी कोणतीही परवानगी घेतलेली नाही व तसा कोणताही अर्ज अखेर सादर केलेला नाही तरी देखील बेकायदेशीरपणे भूमिपूजन सोहळा करण्याचे ठरविलेले आहे अशी माहिती यावेळी दिली.

PDF Compressor Free Version

मेडिकल नीट युजी व पीजी कौन्सिलिंग २०२४

- मेडिकल कॉलेज निवडतांना निकष काय लावावेत ? निकालानंतर प्रेफरन्स फॉर्म (चॉईस) कसा भरावा?
- पीजी साठी वैयक्तिक शाखा निवडतांना काय काळजी घ्यावी? कॉलेज, फीस, बाँड सर्व माहिती दिली जाते
- तुमच्या मार्कानुसार कोणते कॉलेज मिळेल याचा अंदाज दोघांनाही दिला जातो. शास्त्रीय सल्ला व मार्गदर्शन
- सर्व प्रकारचे रजिस्ट्रेशन तसेच समुपदेशन ऑनलाईन फोन कॉल, झूम मिटिंग आणि व्हॉट्सअपद्वारे केले जाईल.
- फॉर्म कसे भरायचे याचा सल्ला दिला जाईल, परंतु फॉर्म भरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. त्यासाठी मार्गदर्शन वैयक्तिक संपूर्णपणे केले जाईल.
- ८ वर्षांपासून ९५% अंदाज खरे ठरले आहेत. अॅडमिशन मिळेपर्यंत संपूर्ण मार्गदर्शन.

संपर्क - डॉ. सुचित तांबोळी व सौ. नेहा तांबोळी
Contact - Dr. Suchit Tamboli Mrs. Neha Tamboli

- ३२ वर्षांचा महाराष्ट्रातील पहिल्या खाजगी बालविकास व पौगंडावस्था केंद्राचा प्रदीर्घ अनुभव
- चिरंजीव क्लिनिक, घुमरे गल्ली, अहमदनगर, फोन - ९८२२२९४५५०, ९५१८५९८१५४

विकणे आहे

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १००० स्के. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.

-: संपर्क :-
9011923939

कै. कि.बा. उर्फ काकासाहेब म्हस्के
स्मृती पुरस्कार २०२४

नगरच्या समाजकारण, शिक्षण, आरोग्य सेवांसह जिल्ह्याच्या कृषी-पाणी प्रश्नांसाठी महत्त्वपूर्ण योगदान असलेले नगर तालुक्याचे माजी आमदार **कै.कि.बा. उर्फ काकासाहेब म्हस्के** यांच्या **१०६ व्या जयंतीनिमित्त रविवार दि. ५ मे २०२४ रोजी सकाळी १०.०० वा.** समाजासाठी निस्पृहपणे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना **कै.कि.बा.उर्फ काकासाहेब म्हस्के** यांचे नावे पुरस्कार देत आहोत. तरी आपण या कार्यक्रमास उपस्थित रहावे ही विनंती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष : **मान. ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव**, आळंदी
प्रमुख पाहुणे : **मान. आमदार श्री. लहुजी कानडे साहेब** (विधानसभा सदस्य, श्रीरामपूर)
माजी आमदार श्री. चंद्रशेखर कदम (देवळाली प्रवरा)
शिक्षण भूषण : **मा. श्री. साहेबराव धाडगे पाटील**
(ग्रामीण भागात शिक्षणाची सेवा देणारे)
आरोग्य भूषण : **मा. श्री.डॉ. हबीब शेख**
(दुर्गम व आदिवासी वाडी वस्तीवर आरोग्य सेवा देणारे आरोग्यदूत)
समाजभूषण : **मा.श्री. भाऊसाहेब उडाणशीवे**
(सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात ४० वर्षांपासून सहभाग)
वृत्त भूषण : **मा. श्री. मोहिनीराज लहाडे** (जेष्ठ पत्रकार)
साहित्य भूषण : **मा. श्री. गिताराम नरवडे**
(शब्दगंध साहित्य परिषद, अ.नगर जिल्हास्तरीय पुरस्कार सन्मानित)

ज्येष्ठ कृषि आणि जलसंधारण तज्ञ कै. भास्करराव म्हस्के यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रगतीशील शेतकरी मा.श्री. सचिनभाऊ जगताप (बनपिंपरी) यांचा 'कृषिमित्र' पुरस्काराने गौरव होईल. निंबोडी येथील कलेक्टर एन.ए. प्लॉटस्च्या विक्री शुभारंभाच्या माहितीपत्रकाचे अनावरण विंग कमांडर श्री. व सौ. रवींद्र पारसनीस यांच्या हस्ते संपन्न होईल.

सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ ● वेळ - दुपारी ४ ते ८ पर्यंत
प्रमुख पाहुणे : मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते/ नाटककार श्री. संदिप श्यामराव पाठक
(चित्रपट - विठ्ठल माझा सोबती, ईडक, नाटक - वऱ्हाड निघालय लंडनला)
आपण आपल्या मित्र परिवारासह कार्यक्रमास उपस्थित राहून शोभा वाढवावी.
स्थळ : काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुल, बोल्हेगाव फाटा, नागापूर, अहमदनगर.

आपले नम्र

डॉ. सुभाष म्हस्के
M.S. Ortho.
(कार्यकारी विश्वस्त)

डॉ. सौ. सुमती म्हस्के
M.B.B.S., D.A.
(विश्वस्त)

डॉ. अभितेज म्हस्के
M.B.B.S., M.S. Ortho. FRCS Ortho Ireland FEBOT; Fellowship in Joint Replacement UK, Ireland
(कार्यकारी विश्वस्त)

डॉ. दिप्ती ठाकरे
B.D.S. (विश्वस्त)

श्री. समीर ठाकरे
B.Arch. (मुख्य कार्यकारी अधिकारी)

डॉ. अनुराधा पाटणकर (प्राचार्या) **श्री. अजित चवरदार** (प्राचार्य) **श्री. नितीन ठुबे** (प्राचार्य)
सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

V-GUARD
V-GUARD

Domestic
Heat Pump Water Heater

अखंडित गरम पाण्यासाठीचा सोपा मार्ग

१७ वर्षांपासून ग्राहकांच्या सेवेत

आदित्य एंटरप्राईजेस

गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर

आमच्या डायनॅमिक सोशल मीडिया टीममध्ये सामील व्हा!

डिझाईनचे कौशल्य आणि डिजिटल सामग्री निर्मितीची आवड असलेले तुम्ही सर्जनशील विझार्ड आहात का?

आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह कृतीशील सोशल मीडिया विभागात सामील होण्यासाठी प्रतिभावान व्यक्ती शोधत आहे.

उपलब्ध पद : सोशल मीडिया क्रिएटिव्ह डिझायनर

जबाबदारीचे स्वरुप :

- आकर्षक नेमप्लेट्स, फ्लेक्स बोर्ड, पुस्तके इत्यादींचे डिझाईन करणे.
- आकर्षक रिल्स, व्हिडिओ एडिटिंग/मिक्सिंग आणि डॉक्युमेंटरी फिल्म बनवणे.
- विविध सोशल मीडियावर माहिती पोस्ट करणे, योग्य चॅटिंग करून समुहाची इमेज बिल्डिंग करणे.

पात्रता :

- ग्राफिक डिझाईन आणि मल्टी मीडिया सामग्री निर्मितीमध्ये कामाचा अनुभव.
- कोरल ड्रॉ आणि फोटोशॉप सॉफ्टवेअरवर मजबूत कमांड.
- सर्जनशील मानसिकता आणि चौकटीबाहेर विचार करण्याची क्षमता

आमच्यात का सामील व्हा ? :

- डायनॅमिक आणि क्रिएटिव्ह वातावरणात काम करण्याची संधी.
- तुमची सर्जनशीलता दाखवण्याची आणि अर्थपूर्ण प्रभाव पाडण्याची संधी.
- उत्तम पगार आणि इतर सवलती.

तुम्ही तुमची सर्जनशीलता दाखवण्यासाठी आणि तुमच्या करिअरला नवीन उंचीवर नेण्यासाठी तयार असाल, तर खालील ठिकाणी स्वहस्ताक्षरातील अर्ज करा किंवा **fdlshevgaon@gmail.com** या मेलवर आपले अर्ज ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सहा दिवसांच्या आत पाठवा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह,
शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा,
भाजकी (काळी) माती,
क्रिस्ट्रल रांगोळी,
कलर रांगोळी, मीठ, नुडल्स,
पांधकाची रांगोळी

m डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८१११११५७/ ९८२२०८१४४०

स्व. प्रफुल्ला नरेंद्र पंड्या
(माजी उपनगराध्यक्षा)
स्व.दि. ५/५/२००९

१५ वे

पुण्यस्मरण

तुझं नसणं आम्हाला पदोपदी जाणवतं
पण तुझे विचार, तुझा आदर्श
कायम आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत
तुझे संस्कार व शिकवण आम्हाला सैदव बळ देत राहील...
आई, तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

मुंजोबा स्वीटस्

पंकज नरेंद्र पंड्या
व पंड्या परिवार
मार्केट यार्ड चौक, स्टेशन रोड, अहमदनगर.
फोन: २३४६८४८.

P2

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - ४ मे ते ११ मे २०२४

बडे मियाँ छोटे मियाँ	10.00 PM
CREW	4.10 PM
जुनं फर्निचर	8.00 AM, 2.10 PM 5.05 PM, 10.35 PM
मैदान	12.45 PM
नाच गं घुमा	8.30 AM, 10.00 AM 1.45 PM, 4.30 PM 7.55 PM, 9.45 PM
स्वरगंधर्व सुधीर फडके	11.00 AM 6.45 PM
THE FALL GUY (HINDI)	11.15 AM 7.15 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show **CONNPLEX** AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)

स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर

9011020176, 9011026483, 7499980845

SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

HATSUN Daily
Red Velvet
Rocky Road

Milk & Cream Icecream Product

Arun® ICECREAMS

प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर ✆ 7219515144

प्रेरणा आणि दिशा

कुटुंबातल्या सर्वांसाठी 'श्रध्देय",
मित्रांसाठी 'भावबंध" असणारं,
उद्योगातील 'कर्मयोगी" आणि
समाजहितासाठी सदैव 'कल्याणमस्तु"
असं म्हणणारं व्यक्तिमत्त्व.
शब्दांच्या कवेत न मावणाऱ्या
धुरंधर, कल्पक, लढावू,
समाजावर नि देशावर प्रेम करणाऱ्या
प्रेरणादायी व्यक्तिमत्वाला
विनम्र अभिवादन..!



स्व. दिलीप शंभुरामजी चंदे
स्वर्गवास : ४ मे २०१५
भावपूर्ण श्रध्दांजली

दीपा, दीप्ती, नकुल, चंदे परिवार
जय जलाराम परिवार

Since 1997 JAI JALARAM® FOOD PRODUCTS
PURE VEG BAKERY PRODUCTS

Design Addict